www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ ठाणे महापालिका क्षेत्रात डिसेंबर महिन्यात हटवले...
पान ३ वर....

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक


लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ बांधकाम परवानगीचे प्रस्ताव आता...
पान ५ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २०९ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, शुक्रवार, ०३ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन होणार मुंबई जिल्हा बँकेतून! - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई : नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच महायुती सरकारने अनेक लोकोपयोगी निर्णयांचा धडाका सुरु केला आहे. गुरुवार, २ जानेवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली रोजी राज्य मंत्रिमंडळाची पहिलीच बैठक पार पडली. या बैठकीत दोन महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले आहेत. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर मंत्री उपस्थित होते.

यातील पहिला निर्णय हा महसूल विभागाशी संबंधित आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम-२२० मध्ये आकारी पड जमिनीच्या संदर्भात असलेल्या तरतुदीत सुधारणा करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

तसेच आता शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन मुंबई बँकेतून होणार आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेत वैयक्तिक खाते उघडण्यास तसेच महामंडळ, सार्वजनिक उपक्रम यांच्याकडील अतिरिक्त निधी गुंतवणुकीस प्राधिकृत करण्यास राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली आहे.

### राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी स्वीकारला पदभार



मुंबई : नगर विकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी मंत्रालयात विभागांचा पदभार स्वीकारला.सर्व संबंधित विभागाचा आढावा घेवून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासंदर्भात आणि त्यांना सोयी-सुविधा पुरवण्यासंदर्भात कार्यवाही करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. जनतेच्या हिताचे निर्णय घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांनी सांगितले.

### ग्रामीण भागात नळाद्वारे पाणीपुरवठ्याच्या योजनांना गती देणार - पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील



मुंबई : पाणीपुरवठा विभागातील प्रगतीपथावरील कामे तातडीने पूर्ण करण्यावर भर देत ग्रामीण भागातील जनतेला नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यासंदर्भातील कामांना गती देणार असल्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले. पान २ वर

# शासनाकडे जमा जमिनी शेतकऱ्यांना मिळणार परत

## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय : ९६३ शेतकऱ्यांना महायुती सरकारचा मोठा दिलासा

● मुंबई, विशाल कारंडे :

शेतसारा अथवा महसुली देणी देवू शकले नाहीत अशा शेतकऱ्यांच्या सरकारने जप्त केलेल्या जमिनी, ज्याला आकारी पड जमिनी म्हणतात त्या पुन्हा त्याच शेतकऱ्यांच्या नावावर करण्याचा अतिशय महत्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने घेतला.



या निर्णयामुळे राज्यातील ९६३ शेतकऱ्यांना सरकारने दिलासा दिला. ही जमीन रेडीरेकनर दराच्या २५ टक्के रक्कम भरून शेतकऱ्यांना परत घेता येईल.

जप्त असलेल्या या जमिनी वर्ग दोनच्या असून त्यांचा ताबा जिल्हाधिकाऱ्यांकडे आहे. या जमिनींच्या संदर्भात देय आकाराच्या रकमा व त्यावरील व्याज यांच्या वसुलीसाठी १२ वर्षांचा कालावधी पूर्ण केल्यानंतर जमिनींचा लिलाव करण्यात येतो. पान २ वर

### शेतकऱ्यांना मोठा दिलासा



महसूल विभागाचा मंत्री म्हणून शेतकऱ्यांसाठी आजचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. आता कायद्यात सुधारणा होतील. माझी सुरूवातच माझ्या शेतकरी बांधवांना दिलासा देण्याने झाली, याचा मला आनंद आहे. दुष्काळ अथवा अनेक अडचणींनी ज्या शेतकऱ्यांनी सरकारला महसूल दिला नाही, त्यामुळे या जमिनी सरकारने ताब्यात घेतल्या होत्या. किमान पन्नास वर्षांपासून याबाबतचा निर्णय प्रलंबित होता. आज शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेऊन मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.

- चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री

# महाराष्ट्र पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय- राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

### महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन साजरा

● मुंबई, विशाल पाटील :

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत 'महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन' साजरा करण्यात आला. पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय असून हे देशातील आदर्श पोलीस दल असल्याचे प्रतिपादन राज्यपाल राधाकृष्णन यांनी केले. गोरेगाव येथील राज्य राखीव पोलीस दलाच्या मैदानावर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी, सेवानिवृत्त अधिकारी, पोलीस जवान व निमंत्रित उपस्थित होते. पान २ वर

# देशातील सर्वात प्रदूषित परिसर म्हणून उरणची नोंद

● उरण, फरीद डावरे

गेल्या सरत्या वर्षात उरणमध्ये सरासरी हवेचा गुणवत्ता निर्देशांक १५० ते २०० च्या पातळीवर राहिला आहे. ही मात्रा मानवी शरीरासाठी घातक म्हणून गणली जाते. या हानिकारक दूषित हवेमुळे वर्षभर उरणकरांचा श्वास कोंडला आहे. या स्थितीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उपाययोजना करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

सध्या मुंबई आणि नवी मुंबई या शहरातील वाढत्या प्रदूषणाची दखल येथील स्थानिक प्रशासनाने घेत त्यासाठी च्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. मात्र दुसरीकडे या दोन प्रमुख शहराचे उपनगर असलेल्या उरण आणि परिसरात दिवसेंदिवस हवेची गुणवत्ता खालावू लागली आहे. येथील वाढत्या प्रदूषणावर उपाययोजना करण्याच्या



सूचना संबंधित आस्थापनाना देण्यात आल्या असल्याचा दावा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केला आहे.

असे असले तरी वर्षभर सातत्याने येथील हवेतील धुळीकणात वाढ होऊ लागली आहे. हवेचा वाढता गुणवत्ता निर्देशांक सामान्य पातळीवर आणण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी गेल्या वर्षी उरण पनवेल राष्ट्रीय महामार्ग आंदोलन करीत उरण सामाजिक संस्थेने केले होते.

# लाडकी बहीण योजनेच्या काही अर्जांची पडताळणी होणार - मंत्री आदिती तटकरे

● मुंबई, दिगंबर जाधव :

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी भाष्य केलं आहे. आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसंदर्भातील शासन निर्णयात कोणताही बदल केला जाणार नाही, असं स्पष्ट केलं. ज्या महिलांचं उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असेल त्यांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळेल, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं. काही अर्जांच्या बाबतीत आम्ही पडताळणीची प्रक्रिया करत आहोत, असं देखील आदिती तटकरे यांनी म्हटलं.

पान २ वर

### शासन निर्णयात बदल होणार नाही



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जो शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. त्यामध्ये कसलाही बदल होणार नाही, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं. ज्यांचं उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असेल त्यांनाच या योजनेचा लाभ मिळणार आहेत. काही महिलांकडून ऑनलाइन अर्ज आणि ऑफलाइन अर्ज आले होते. काही महिलांचं लग्नानंतर स्थलांतर देखील झालं असल्याचं आदिती तटकरे म्हणाल्या. चारचाकी वाहनं ज्यांच्या नावावर असतील आणि तरी देखील ज्यांनी अर्ज केला असेल त्यांच्या नावांचा शोध घेण्यासाठी परिवहन विभागाकडून माहिती घेतली जाईल, असं देखील आदिती तटकरे म्हणाल्या. आधार कार्ड आणि बँकेतील नावात तफावत असल्यास ते अर्जदार पात्र असणार नाहीत, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं.

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रशंसा

● मुंबई, यश सावंत :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येत असलेल्या विविध प्रयत्नांची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे. नववर्षाच्या प्रारंभी मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी केलेला गडचिरोली दौरा हा येथील नागरिकांच्या आयुष्यात सुख-समाधान आणण्यासह सकारात्मक बदल घडवून आणेल, असा विश्वास प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी 'एक्स'च्या माध्यमातून व्यक्त केला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन वर्षाच्या प्रारंभी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी विविध विकासकामांची सुरूवात करतानाच सामाजिक सलोखा आणि शांतता अबाधित रहावी यासाठी आपला संकल्प जाहीर केला. गडचिरोली यापुढे महाराष्ट्रातील शेवटचा जिल्हा राहणार नसून तो पहिला जिल्हा ठरण्यासाठी प्रयत्न करण्याबरोबरच, याठिकाणी सुरू असलेल्या औद्योगिकीकरणामुळे इथल्या नागरिकांना अत्याधुनिक पायाभूत सुविधा मिळतील, अशी ग्वाही यावेळी दिली.

गडचिरोली च्या विकासासाठी राज्य शासनाने घेतलेला पुढाकार आणि त्यास मिळत असलेल्या नागरिकांच्या प्रतिसादाबद्दल प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी गडचिरोली आणि परिसरातील नागरिकांचे विशेष अभिनंदन केले आहे. पान २ वर

### प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वात गडचिरोली नक्षलमुक्त करण्यासह नागरिकांना मुख्य प्रवाहात आणणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा पाठिंबा आणि मार्गदर्शन यामुळेच गडचिरोलीसारख्या दुर्गम आणि आदिवासी भागांच्या विकासासाठी अथक प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळत असल्याचे आपल्या 'एक्स' या समाजमाध्यमावर नमूद केले आहे. प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या नेतृत्वात गडचिरोली नक्षलमुक्त करून आदिवासी बांधवांचे जल, जमीन आणि जंगल हे हक्क अबाधित ठेवत त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यात येईल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

# राज्यातील १२ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या



● पुणे, शकील शेख :

राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून प्रशासकीय सेवेतील वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांनाही पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच, पुणे, सातारा जिल्हाधिकारीही बदलण्यात आले आहेत. राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव व्ही. राधा यांच्या आदेशाचे पत्र जारी करण्यात आले आहेत. त्यानुसार, मिलिंद म्हैसकर यांना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवपदी कार्यभार देण्यात आला आहे. तर, वेणुगोपाल रेड्डी यांना उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि वन विभागाच्या अतिरिक्त सचिवपदी जबाबदारी देण्यात आली आहे.

पान २ वर

### पुण्याच्या जिल्हाधिकारीपदी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची बदली

■ साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची पुण्याचे कलेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाने आपली बदली केली असून, आपली नियुक्ती, जिल्हाधिकारी, पुणे या पदावर डॉ. सुहास दिवसे, भाप्रसे यांच्या जागी ते पद वरिष्ठ समय श्रेणीत अवनत करून केली आहे. आपल्या जागी श्री. संतोष पाटील, भाप्रसे यांची नियुक्ती केली आहे. तरी, आपण आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून, नवीन पदाचा कार्यभार डॉ.दिवसे, भाप्रसे यांच्याकडून त्वरीत स्वीकारावा, असे पत्र अवर सचिव व्ही. राधा यांनी जारी केले आहे.

### संतोष पाटील साताऱ्याचे जिल्हाधिकारी

■ पुण्यातील जिल्हा परिषद सीईओ संतोष पाटील यांची सातारा जिल्हाधकारीपदी नियुक्ती करण्यात आली आहे. शासनाने आपली बदली केली असून, आपली नियुक्ती, जिल्हाधिकारी, सातारा या पदावर श्री. जितेंद्र डूडी, भाप्रसे यांच्या जागी केली आहे. तरी, आपण आपल्या सध्याच्या पदाचा कार्यभार विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांच्या सल्ल्याने अन्य अधिकाऱ्याकडे सोपवून, नवीन पदाचा कार्यभार त्वरीत स्वीकारावा, असे बदली आदेश पारीत करण्यात आले आहेत.

# व्यक्तीला आधार, तसा आता पायाभूत सुविधा प्रकल्पाला सुद्धा युनिक आयडी

● मुंबई, राकेश गायकवाड :

### सर्व समाज विकास महामंडळे एका आयटी प्लॅटफॉर्मवर आणणार, ई-कॅबिनेटचेही सूतोवाच

आधार हा जसा एका व्यक्तीचा युनिक आयडी असतो, तसाच युनिक आयडी प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी तयार करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मंत्री उपस्थित होते.

अनेक विभाग एकाच ठिकाणी एकाच प्रकारची विकासकामे करतात. त्यातून तीच ती कामे होऊन कोट्यवधी रुपयांचे नुकसान होते. आधार क्रमांकामुळे जसे अनेक बोगस लाभार्थी आणि तीच ती नावे वगळली गेली, तसेच या निर्णयामुळे त्याच त्या विकासकामांची पुनरावृत्ती टाळता येणार आहे. यातून विकासकामांचे सुयोग्य नियोजन व्हावे आणि त्यात सुसूत्रता असावी, यासाठी प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पाला युनिक आयडी असावा, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. पान २ वर

## संपादकीय

### युरोपीय देशांमध्ये अस्थिरतेचे वातावरण

फिनलंडच्या पंतप्रधानांनी नुकतेच असे म्हटले आहे की, रशिया युरोपियन महासंघासाठी मोठा धोका आहे. रशिया फिनलंडवर आक्रमण करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. म्हणूनच, त्यांच्या या विधानाला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त होते. त्यांचे हे विधान, युरोपमधील विकसित भू-राजकीय परिदृश्य स्पष्ट करणारे ठरते. नुकत्याच घडलेल्या काही घडामोडींमुळे, त्यांच्या विधानाला निश्चित असा अर्थ आहे. विशेषतः रशियाच्या वाढलेल्या लष्करी कारवाया आणि युक्रेनवर केलेले आक्रमण, यांची त्याला पार्श्वभूमी आहे. रशियामुळे प्रादेशिक सुरक्षा धोक्यात आली आहे, हा युरोपीय देशांचा तसा जुनाच आरोप. युरोपीय देशांना रशियामुळेच अस्थिरतेचा सामना करावा लागत आहे, असाही आरोप होत आहे. यात युरोपीय देशांमध्ये अस्थिरतेचे वातावरण निर्माण करणे, सायबर हल्ले घडवून आणणे यांचा समावेश करता येईल. विशेषतः रशियाशी सीमा असलेल्या,बाल्टिक राष्ट्रांमध्ये भीतीचे वातावरण त्यामुळेच दिसून येते. म्हणूनच, पोलंड आणि फिनलंड यांसारख्या देशांनी रशियन आक्रमणाच्या शक्यतेने, त्यांच्या संरक्षणात वाढ केली आहे. फिनलंडची रशियाबरोबर १ हजार, ३४० किमी सीमा सामायिक आहे. म्हणूनच, त्याला रशियन धोक्याची जास्त शक्यता आहे. १९३९-१९४० या कालावधीत, या देशाने तत्कालीन सोव्हिएत रशियाच्या आक्रमणाविरोधात लढा दिला होता. रशियाबरोबर युद्ध होण्याच्या शक्यतेने, फिनलंड म्हणूनच आपल्या लष्करी क्षमतांमध्ये वाढ करताना दिसून येतो आहेच. त्याशिवाय तो 'नाटो' तसेच इतर सहयोगी देशांसोबत, आपले संबंध मजबूत करताना दिसून येतो. तथापि, युरोपीय महासंघाने रशियाबरोबरचे आपले संबंध सुधारणेही तितकेच गरजेचे आहे, असे म्हणावे लागेल. यात विशेषत्वाने आर्थिक संबंध, ऊर्जा अवलंबित्व आणि भू-राजकीय स्थिरता यांचा उल्लेख करावा लागेल. युरोपीय महासंघाने रशियावर ज्या आक्रमकतपणे निर्बंध लागू केले, त्याचा सर्वाधिक फटका युरोपातील देशांनाच बसला, हे वास्तव आहे.

रशियाने २०२२ मध्ये युक्रेनवर जो हल्ला केला, त्यात 'नाटो'ची कळीची भूमिका आहे. युक्रेनने 'नाटो'मध्ये सहभागी होऊ नये, ही रशियाची मागणी होती. 'नाटो'च्या माध्यमातून रशियाच्या सीमेपर्यंत पाश्चात्य राष्ट्रांचे सैन्य येण्यास, रशियाचा पहिल्यापासूनच विरोध होता. तथापि, युक्रेनने 'नाटो'वर जो अनाठायी विश्वास ठेवला, त्याची परिणती रशिया-युक्रेन युद्धात झाली. २०२२ पासून आजही युक्रेन रशियाच्या आक्रमणाखाली अक्षरशः होरपळत आहे. रशियाने 'नाटो'ला का विरोध केला, हेही पाहिले पाहिजे. रशिया आणि 'नाटो' यांच्यातील संबंध, हे अतिशय गुंतागुंतीचे आहेत. १९४९ मध्ये 'नाटो'ची जेव्हा स्थापना झाली, तेव्हापासूनच त्यांच्यात कटुता दिसून येते. युरोपमधील सोव्हिएत युनियनला रोखण्यासाठी, 'नाटो'ची स्थापना सामूहिक संरक्षण आघाडी म्हणून करण्यात आली. शीतयुद्धाच्या काळात, 'नाटो' आणि 'वॉर्सा' करार (सोव्हिएत युनियनच्या नेतृत्वाखाली) थेट विरोधात होते, त्यामुळे लष्करी तणावाची द्विध्रुवीय जागतिक व्यवस्था निर्माण झाली. १९९१ मध्ये सोव्हिएत युनियनच्या पतनानंतर, 'नाटो'ने आपली भूमिका पुन्हा एकदा मांडण्याचा करण्याचा प्रयत्न केला. १९९०च्या दशकाच्या उत्तरार्धात तसेच २०००च्या प्रारंभी आणखी काही देश , 'नाटो'मध्ये सहभागी झाले. ज्यांना रशियाच्या आक्रमणाची भीती होती, तेच देश सहभागी झाले, हे लक्षात घ्यायला हवे.

'नाटो'चा पूर्वेकडील विस्तार हा वादाचा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. पोलंड, हंगेरी आणि बाल्टिक राज्यांसारखे देश 'नाटो'मध्ये सामील झाल्याने, रशियाला 'नाटो'चे सैन्य रशियाच्या सीमेवर दाखल होत असल्याची भावना वाढीस लागली. 'नाटो' सदस्य राष्ट्रांच्या मदतीने केव्हाही आपल्यावर आक्रमण करेल, ही रशियाची भीती अनाठायी नव्हती. म्हणूनच, युक्रेनच्या सदस्यतेला रशियाने विरोध केला. १९९०च्या दशकात बाल्कनमध्ये झालेला लष्करी हस्तक्षेप आणि १९९९च्या युगोस्लाव्हियावर झालेल्या बॉम्बहल्ल्याने, तणावात वाढ झाली. जॉर्जियातील २००८च्या युद्धात, 'नाटो'ने सक्रिय हस्तक्षेप केला. त्यामुळे रशिया आणि 'नाटो' यांच्यातील तणाव वाढत गेला. युक्रेनवर जो हल्ला झाला, त्याची पाळेमुळे २०१४च्या क्रिमियाच्या विलयीकरणात रुजली गेली होती. पाश्चात्य राष्ट्रांनी या घटनेकडे, आंतरराष्ट्रीय कायद्यांचे झालेले उल्लंघन असे पाहिले. आणि म्हणूनच, युक्रेनला सदस्य करून घेण्याच्या मोहिमेला वेग आला. 'नाटो'ने रशियाच्या सीमेवर असलेल्या सदस्य राष्ट्रांमध्ये लष्करी सरावाचे जे आयोजन केले, त्यामुळे रशियाची चिंता वाढली. पूर्व युरोपमध्ये आपली लष्करी उपस्थिती वाढवण्यावर 'नाटो'ने जो भर दिला, तो रशियाच्या सुरक्षेबद्दलची काळजी वाढवणारा ठरला. रशिया आणि 'नाटो' यांच्यातील वाद आज युक्रेनला युद्धाच्या खाईत ढकलणारे ठरले आहेत. सीमेची सुरक्षा हा रशियाचा दावा आहे, तर पाश्चात्य राष्ट्रांना रशियापासून धोका वाटतो. म्हणूनच, ते 'नाटो'च्या माध्यमातून रशियावर नियंत्रण ठेवण्याच्या प्रयत्नात आहेत. रशिया तसेच 'नाटो' या दोघांनाही आपली ध्येयधोरणे साध्य करायची आहेत. त्यातूनच रशियाच्या सीमेवर अशांततेचे वातावरण आहे.

युक्रेनवर हल्ला झाल्यानंतर फिनलंडने 'नाटो'चे जे सदस्यत्व घेतले, त्याचाच अपरिहार्य भाग म्हणून आज फिनलंडवर युद्धाचे ढग घोंघावत आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपण निवडून आल्यानंतर 'रशिया-युक्रेन युद्ध संपुष्टात आणू.' असे आश्वासन दिले होते. तसेच, युरोपमधील देशांनी आपली युद्धे स्वतःच्या ताकदीवर लढावीत, अमेरिका आता त्यासाठी खर्च करणार नाही असे म्हटले होते. त्यामुळेच, ट्रम्प यांनी कार्यभार हाती घेतल्यानंतर 'नाटो'ला अमेरिकेकडून पहिल्यासारखीच मदत मिळत राहणार का, हाही प्रश्न आहे. 'नाटो'चे सदस्य राष्ट्र त्यांच्या स्वतःच्या संरक्षणासाठी पुरेशी तरतूद करत नाहीत, यावर ट्रम्प यांचा आक्षेप आहे. युरोपीय देशांनी आता स्वतःच्या संरक्षणासाठी भरीव तरतूद करावी, ही अमेरिकेची अपेक्षा आहे. त्यामुळेच, ट्रम्प यांच्या कार्यकाळात युक्रेन प्रश्नी ते कशी भूमिका घेतात, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागलेले आहे. युरोपीय महासंघाच्या रक्षणासाठी अमेरिका धावणार का? हा प्रश्न त्यातून उभा राहतो. 'अमेरिका फर्स्ट'हे ट्रम्प यांचे धोरण राहिले आहे. या पार्श्वभूमीवर फिनलंडने व्यक्त केलेली भीती आणि सज्जतेसाठी हाती घेतलेली मोहीम ही महत्त्वाची ठरते.

# स्त्री शिक्षणाची प्रकाशवाट - ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले

ज्ञानज्योती सावित्रीबाई नुसतं एक नाव नाही तर स्त्री मुक्ती चळवळी साठी जीवाचे रान करणारी हाती शिक्षणाची मशाल घेऊन कितीतरी मुलींचे जीवन त्या प्रकाशात उजळून काढणारी धगधगती मशाल होती. सावित्रीबाईचे जीवन जणू रखरखत्या विस्तवावरून अनवाणी चालण्यासारखे होते कारण तत्कालीन परिस्थिती लक्षात घेता स्त्रियांना शिक्षणाचे तर अधिकार नव्हतेच त्याचबरोबर इतर सामाजिक बंधनेही खूप होती. केवळ अज्ञानातून या सर्व गोष्टींचा सामना स्त्रियांना करावा लागायचा. या सामाजिक बंधनाच्या श्रृंखला हजारो वर्षापासून स्त्रियांच्या पायात अडकून पडलेल्या होत्या. त्यांना साधे चालणेच काय तर स्वैराचाराने उठणे- बसणे सुद्धा अति कठीण. बदलत्या काळाबरोबर चालणे अन धावणे तर दूरच.....! या माऊलीने स्त्री मुक्तीसाठी त्यांच्या पायात अडकून पडलेल्या रुढीपरंपरा,चालीरीती व बंधनाच्या श्रृंखला,की ज्या कितीतरी वर्षापासून अक्षरशः पायांना अन्याय, अत्याचार,गुलामीच्या रूपाने जखडून ठेवलेल्या होत्या, अज्ञानातून त्या शृंखलाअजून घट्ट होत चालल्या होत्या त्यावर शिक्षण व ज्ञानाचा घाव घालून मोकळ्या केल्या. स्त्री फक्त चूल आणि मुलांपर्यंत मर्यादित नाही तर, एक दिव्यशक्ती आहे. ही शक्ती पुरुषांबरोबर त्यांच्या खांद्याला खांदा लावून प्रगती करू शकते याची ओळख जगाला पटवून दिली. स्त्रियांना शिक्षणरुपी मोकळा श्वास त्यांना घ्यायला शिकवला की ज्या श्वासाने तत्कालीन स्त्रियांबरोबर आजच्या स्त्रियांचे जीवन उजळून निघाले.त्यांचा परिणाम स्वरूप आजची स्त्री सर्वच क्षेत्रांमध्ये अग्रेसर आहे. आज जवळपास पावणे दोनशे वर्षांपूर्वीची स्थिती लक्षात घेता,स्त्री शिक्षण विरोधी समाजकंटकासमोर सावित्रीबाई स्वतः वनव्यासारख्या जळत होत्या मात्र त्या वनव्यातून "प्रकाशाची वाट"दाखवून आजच्या माता भगिनींना तेजस्वीसूर्यासारखे प्रखर व कणखर बनवले. कारण स्त्रियांनी शिक्षण घेणे म्हणजे "धर्म बुडाला"ही बुरसट कल्पनाच त्यांनी मोडीस काढली.यामागील कपटनीती हिच की स्त्रियांना शिकविले तर त्यांना सत्याची जाणीव होईल व एकदा का स्त्रियांना सत्याची व खऱ्या धर्माची येथे धर्म म्हणजे हिंदू मुस्लिम वगैरे या अर्थाने नव्हे तर खरा धर्म म्हणजे मानवतेच्या आचरण पद्धतीची ओळख झाल्यास स्त्रियांवर लादल्या जाणारे सामाजिक बंधने,त्यांना गुलाम बनवण्याची तुच्छ स्वरूपाची खेळी उघडकीस येईल. केवळ अशा विचारहीन चालीरीतीं रूढी परंपरा व बुरसट कल्पना मोडीत काढण्यासाठी क्रांतीसुर्य ज्योतिबांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून सावित्रीबाईंना पदोपती सहकार्य केले.



क्रांतीज्योती सावित्रीबाईंचा वयाच्या नव्या व ज्योतिबांचा तेराव्या वर्षी विवाह झाला त्यांना ज्योतिबांनी शिकविले आणि जेव्हा दोघांनी १ जानेवारी १८४८ ला पुणे येथे भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली तेथे शिक्षका म्हणून सावित्रीबाईंनी मुलींना शिकवण्याचे कार्य केले. सावित्रीबाई जेव्हा शाळेत शिकवायला जायच्या तेव्हा समाजकंटक त्यांच्यावर शेण फेकून मारायचे. एवढेच नाही तर अंगावर हात टाकायची भाषा करायचे,मात्र कणखर- तेजस्वी सावित्रीबाई डगमगल्या नाही त्यांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य सुरूच ठेवले. आजच्या काळात तत्कालीन संघर्षमय जीवन आपणास ऐकण्यास वाचनास सहज सुलभ वाटते,परंतु अशा विचारहीन रूढी परंपरा रुपी प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने ज्ञानदानाची नौका न डगमगता पार करणे तेवढे सोपे नव्हते.कल्पनेच्याही पलीकडची स्थितीहोती की ज्याची कल्पना डोळयासमोर आल्यास अंगावर शहारे आल्याशिवाय राहत नाही. आजची परिस्थिती लक्षात घेता अनेक शैक्षणिक संस्था,शाळा,महाविद्यालये गावोगावी सर्व जातीधर्मांसाठी विध्यार्थ्यांसाठी खुली आहेत. मुलगी जन्मल्यानंतर कोणत्याही शाळेत आपण शिक्षणासाठी तिला सहज दाखल करू शकतो. स्त्रीशिक्षणरुपी फळांचा व फुलांचा आस्वाद ज्या माता भगिनी आज ज्ञानरूपी शिक्षण संस्थेच्या बागेतून घेत आहे त्यासाठी सावित्रीबाई या माऊलीने अपार कष्ट व त्रास सहन केला.

ज्ञानज्योती सावित्रीबाईंनी शैक्षणिक कार्याबरोबर स्त्रियांसाठी सामाजिक कार्य सुद्धा केले. बालविवाह प्रतिबंधक कायद्यासाठी ज्योतिबांबरोबर मोलाचे योगदान दिले.बालवयात विधवा झालेल्या मुलींना- महिलांना सती जावे लागायचे किंवा त्यांचे केसवपन करून कुरूप बनवल्या जायचे यातून पीडित महिलांची मुक्तता करण्यासाठी "केशवपन पद्धतीचा" विरोध केला. त्यांना सन्मानाने जगण्यासाठी त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला. त्याचबरोबर विधवांचे पुनर्विवाह व्हावे यासाठी कार्य केले समाजकंटकांना चपराक म्हणून काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल दत्तक घेऊन यशवंत नाव ठेवले. सावित्रीबाई साक्षर झाल्यानंतर शिक्षिका, मुख्याध्यापिका म्हणून काम बघितले व त्याचबरोबर साहित्य लेखन सुद्धा केले. साहित्यातून स्त्री शिक्षणाची व अन्यायाविरुद्ध लढण्याची कास धरली. रूढी परंपरा वाईट सामाजिक जनरीती, चालीरितींचा कडाडून विरोध केला. महात्मा फुले यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाचे कार्य हाती घेतले व त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवला. ज्योतिबांची भाषणे,कार्य,विचार साहित्य लेखनाच्या माध्यमातून जगासमोर आणले. पीडित, दुखी, कष्टी महिलांना सन्मानाने जगता यावे, यासाठी सत्यशोधक कुटुंबात सहभागी करून घेतले. मात्र सण १८९६-९७ च्या काळात प्लेग या साथीच्या आजाराने सर्वत्र धुमाकूळ घातली होती. या आजारातून कित्येकांचे बळी गेले. सर्वसामान्य गोर -गरिबांचे हाल लक्षात घेता, प्लेग पीडितांसाठी आरोग्याच्या सुविधा पुरवल्या.दवाखाना उभारला. प्लेगग्रस्त रोगी व त्यांच्या कुटुंबांना सावित्रीबाई मायेचा आधार देऊ लागल्या, परंतु प्लेग या साथीच्या रोगाने काळाचा घाला घातला व या अनाथाच्या मायमाऊलीस रोग्यांची सेवा करता- करता १० मार्च १८९७ रोजी मृत्यूने कवटाळले. क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या कार्यास शतशः नमन व जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन....!

**श्री.विनोद शेनफड जाधव,**
**मासरूळ जि - बुलडाणा**

## पान १ वरून...

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून मुख्यमंत्री...

महाराष्ट्र शासन राबवित असलेले विविध उपक्रम, योजना, अभियान यामुळे राज्याच्या प्रगतीचा मार्ग आणखी प्रशस्त होईल, असा विश्वास प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी आपल्या 'एक्स' या समाजमाध्यमावर व्यक्त केला आहे.

नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गडचिरोली जिल्ह्याचा दौरा केला. त्यांच्या उपस्थितीत जहाल नक्षली ताराक्कासह ११ नक्षलवाद्यांनी शरणागती पत्करली. देशाच्या स्वातंत्र्यानंतर ७७ वर्षांत प्रथमच अहेरी ते गर्देवाडा या बससेवेचा त्यांनी शुभारंभ केला. या बसमधून त्यांनी प्रवासही केला. लॉईडच्या विविध उपक्रमांचा त्यांनी शुभारंभ केला. यातून ६ हजार २०० कोटींची गुंतवणूक होत असून, चार हजारावर रोजगारनिर्मिती होत आहे. गट्टा-गर्देवाडा-वांगेतुरी मार्ग तसेच ताडगुडा पुलाचे श्री. फडणवीस यांनी लोकार्पण केले. पेनगुंडा येथे जवानांशी आणि ग्रामस्थांशी त्यांनी संवाद साधला. या भागात जाणारे ते पहिलेच मुख्यमंत्री ठरले आहेत. गडचिरोली जिल्ह्याची ही विकासयात्रा यापुढेही सुरू राहील, असा विश्वास श्री. फडणवीस यांनी येथील नागरिकांना दिला.

### आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

तसेच, पुणे जिल्ह्याच्या जिल्हाधिकारीपदी साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर, सातारा जिल्हाधिकारीपदी संतोष पाटील यांना जबाबदारी देण्यात आली आहे.

राज्यातील १२ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून त्यामध्ये २ महिला अधिकारी आहेत. तर, सातारा व पुणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी बदलण्यात आले आहेत. पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे यांना पदोन्नती देत भूमी अभिलेख विभागाच्या जमाबंदी आयुक्तपदी करण्यात आली आहे. तर, पुणे झेडपीचे सीईओ संतोष पाटील यांना साताऱ्याचे जिल्हाधिकारी नियुक्ती दिली आहे. तसेच, साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आता पुण्याचे जिल्हाधिकारी असणार आहेत.

१२ अधिकाऱ्यांच्या बदल्या, कुणाला कुठे पदभार

१. मिलिंद म्हैसकर (आयएएस:आरआर:१९९२) अतिरिक्त मुख्य सचिव (१), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अतिरिक्त मुख्य सचिव (वने), महसूल आणि वन विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

२. बी. वेणुगोपाल रेड्डी (आयएएस:आरआर:१९९४) अतिरिक्त मुख्य सचिव (वने), महसूल आणि वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अतिरिक्त मुख्य सचिव, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

३. विकास चंद्र रस्तोगी (आयएएस:आरआर:१९९५) प्रधान सचिव, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग., मंत्रालय, मुंबई यांना प्रधान सचिव (कृषी), कृषी आणि एडीएफ विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर नियुक्त करण्यात आले आहे.

4. आय.ए. कुंदन (आयएएस:आरआर:१९९६) प्रधान सचिव, शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांची प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

५. विनिता वैद सिंगल (आयएएस:आरआर:१९९६) प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रधान सचिव, पर्यावरण आणि हवामान बदल विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

६. डॉ.हर्षदीप कांबळे (आयएएस:आरआर:१९९७) यांना प्रधान सचिव, सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

७. डॉ. निपुण विनायक (आयएएस:आरआर:२००१) प्रकल्प संचालक, RUSA, उच्च तंत्रशिक्षण विभाग, मुंबई यांना सचिव (१), सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई नियुक्त करण्यात आले आहे.

८. जयश्री भोज (आयएएस:आरआर:२००३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ, मुंबई यांची सचिव, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.

९. डॉ. सुहास दिवसे (आयएएस:एससीएस:२००९) जिल्हाधिकारी, पुणे यांची सेटलमेंट कमिशनर आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१०. श्री.एच.एस.सोनवणे (आयएएस:एससीएस:२०१०) यांची नियुक्ती आयुक्त, क्रीडा आणि युवक, पुणे म्हणून करण्यात आली आहे.

११. श्री संतोष पाटील (आयएएस:एससीएस:२०१३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांची जिल्हाधिकारी, सातारा म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

१२. श्री जितेंद्र दुडी (आयएएस:आरआर:२०१६) जिल्हाधिकारी, सातारा यांची पुणे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

### महाराष्ट्र पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय-...

राज्यपाल म्हणाले की, मागील काही वर्षांमध्ये पोलीस दलातील आव्हाने वाढली आहेत. सागरी सुरक्षा, नक्षलवाद यांसारखे धोके आहेतच. त्याशिवाय सायबर सुरक्षा, युवकांमध्ये वाढती नशाखोरी आदी नव्या आव्हानांमुळे पोलिसांना अधिक सतर्क राहणे गरजेचे आहे. राज्य शासन पोलीस दलाचे आधुनिकीकरण करीत आहे. तसेच मोठ्या प्रमाणावर पोलीस भरती देखील होत आहे. यामध्ये महिलांची वाढती संख्या ही उल्लेखनीय बाब आहे. महाराष्ट्र पोलीस हे केवळ भारतातच नव्हे तर जगभरात त्यांच्या अद्वितीय समर्पण, शौर्य आणि उत्कृष्टतेसाठी ओळखले जातात. या जबरदस्त दलाने दहशतवादी हल्ले, संघटित गुन्हे, टोळी युद्धे आणि बॉम्बस्फोट अशा असंख्य आव्हानांना सामोरे जात त्यांचा यशस्वी सामना केला असल्याचे राज्यपालांनी यावेळी नमूद केले.

मुंबईवरील २६ नोव्हेंबर २००८ च्या हल्ल्यात दहशतवाद्यांना पकडून देण्यासाठी गोळया झेललेल्या तुकाराम ओंबळे यांच्या शौर्याचे राज्यपालांनी विशेष कौतुक केले. अशा शौर्यांच्या माध्यमातून भारत कोणत्याही प्रकारचा दहशतवाद खपवून घेणार नसल्याचा संदेश दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले. एक गुन्हेगार पुढे टोळीचे रूप धारण करू शकतो, त्यामुळे अनधिकृत शस्त्रे, अमली पदार्थ यांना पायबंद घालून महाराष्ट्र पोलीस गुन्हेगारी नष्ट करेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

२ जानेवारी १९६१ रोजी भारताचे तत्कालीन प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांनी महाराष्ट्र पोलीस दलाला पोलीस ध्वज प्रदान केला होता. त्यामुळे २ जानेवारी हा दिवस पोलीस वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो, अशी माहिती पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी प्रास्ताविकाद्वारे दिली. भयमुक्त वातावरण ठेवून सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा नाश करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले.

सुरुवातीला राज्यपालांनी वर्धापन दिन संचलनाचे निरीक्षण केले व शिस्तबद्ध संचलनाकडून मानवंदना स्वीकारली. संचलनामध्ये राज्य राखीव पोलीस बल पथक, मुंबई पोलीस सशस्त्र दल पथक, मुंबई पोलीस महिला पथक, ठाणे शहर- लोहमार्ग पोलीस पथक, मुंबई पोलीस दंगल नियंत्रण पथक तसेच निशान टोळी सहभागी झाले होते. यावेळी विशेष संचलन आणि हर्ष परेड सादर करण्यात आली. तसेच पाईप बँड आणि सायलेंट आर्म ड्रिल ची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. यावेळी महासंचालकांनी राज्यपालांना स्मृतिचिन्ह प्रदान केले.

### ग्रामीण भागात नळाद्वारे पाणीपुरवठ्याच्या...

मंत्रालयातील दालनात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा पदभार श्री.पाटील यांनी स्वीकारला. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, या विभागाच्या योजना यापूर्वीही प्रभावीपणे राबविण्यात आल्या असून प्रगतीपथावरील योजनांसाठी आवश्यक निधी वितरित करण्यात येईल. पाण्याची कमतरता भासू नये यासाठी तांत्रिक बाबींचा आढावा घेऊन विविध कामांना गती देणार आहे. विभागाच्या माध्यमातून पाण्याची मूलभूत गरज पूर्ण करणे ही शासनाची प्राथमिकता असल्याचेही श्री.पाटील यांनी यावेळी सांगितले.

### व्यक्तीला आधार, तसा आता पायाभूत सुविधा...

त्यामुळे कोणत्या भागात, कोणत्या कामाचे नियोजन केले आहे आणि नेमके कोठे, कोणत्या प्रकल्पाची गरज आहे, हे एकत्रितपणे एका डॅशबोर्डवर उपलब्ध असेल. त्यामुळे नेमक्या कोणत्या प्रकल्पाची कुठे गरज आहे, हे सुद्धा सहजतेने कळेल. यातून संतुलित विकास साधता येईल आणि निधी, श्रमशक्ती याचा सुयोग्य वापर होईल. ही माहिती पीएम गतिशक्ती पोर्टल, ग्रामविकास पोर्टल, महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग अप्लिकेशन सेंटर (एमआरसॅक) इत्यादींशी एकिकृत असेल. याचे प्रारूप निश्चित करण्यासाठी एक समिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निश्चित केली. यात नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, प्रधान सचिव (व्यय) सौरभ विजय, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांचा समावेश आहे. या समितीने आपला अहवाल मंत्रिमंडळाला सादर करायचा आहे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

याचप्रमाणे राज्यातील सर्व समाज विकास महामंडळे एका आयटी प्लॅटफॉर्मवर आणण्याचा निर्णय सुद्धा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्यामुळे सर्व विकास महामंडळाच्या सर्व योजना एका ठिकाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे 'इज ऑफ लिव्हिंग'चा उद्देश साध्य होणार आहे, शिवाय सर्व समाजघटकांना एकाच ठिकाणी सर्व योजना आणि त्याचे लाभ घेता येणार आहेत. याचे प्रारूप निश्चित करण्यासाठी सुद्धा ४ अधिकाऱ्यांची समिती गठित करण्यात आली आहे. यात नगरविकास-१ चे अतिरिक्त मुख्य सचिव असीम गुप्ता, उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास रस्तोगी, ग्रामविकास सचिव विजय वाघमारे, पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांचा समावेश आहे. यांनाही राज्य मंत्रिमंडळाला आपला अहवाल सादर करायचा आहे.

याच बैठकीत 'ई ऑफिस'च्या धर्तीवर 'ई-कॅबिनेट'चे सूतोवाच करण्यात आले. राज्य मंत्रिमंडळाचा संपूर्ण मसुदा हा टॅबच्या माध्यमातून हाताळण्यात यावा, यातून कागदाची बचत होऊन पर्यावरण जपले जाईल, ही त्यामागची भावना आहे.

### शासनाकडे जमा जमिनी शेतकऱ्यांना मिळणार...

लिलावाच्या रकमेतून शासनाचे येणे वसूल केले जाते आणि उर्वरित रक्कम शेतकऱ्यांना परत केली जाते. ही उर्वरित रक्कम शेतकऱ्यांनी शासनाला द्यायच्या रकमेपेक्षा खूप जास्त असते. शासनाला मिळणाऱ्या अल्परकमेसाठी शेतकऱ्यांची जमीन वर्षानुवर्षे शासनाकडे पडून राहण्यापेक्षा रेडीरेकनर दराच्या २५ टक्के रक्कम भरून शेतकऱ्यांना परत मिळावी यासाठी हा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. या जमिनी वर्ग एकमध्ये आणून ज्या शेतकऱ्यांच्या होत्या त्यांच्याच नावे करता येतील. यासाठी राज्य सरकार कायद्यात सुधारणा करणार आहे.

या संदर्भात मंत्रिमंडळ बैठकीनंतर झालेल्या पत्रकारांना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, राज्यातील ९६३ शेतकऱ्यांच्या चार हजार ९४९ हेक्टर आर जमिनी शासन जमा झाल्या होत्या. शेतसारा न भरल्यामुळे या जमिनी संबंधित तहसीलदारांनी शासनाकडे जमा केल्या होत्या. आज मुख्यमंत्री श्री . देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण ९६३ शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर करण्याचा निर्णय घेतला आहे. रेडीरेकनर दराच्या २५ टक्के रक्कम भरून ही जमीन पुन्हा नावावर केली जाईल.

### लाडकी बहीण योजनेच्या काही अर्जांची...

आदिती तटकरे यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत काही तक्रारी आल्या होत्या. आधार कार्ड मिस मॅचच्या तक्रारी आल्या होत्या. ज्यांचं बँक खात्यावरील नाव आणि आधार कार्डवरील माहिती जुळत नसल्यास त्यांना लाडकी बहीण योजनेचे पैसे मिळणार नाहीत, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं. लाडकी बहीण योजनेबाबत पडताळणीची यंत्रणा तयार करत आहोत, असं देखील त्या म्हणाल्या.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# राज्य क्रीडा दिनानिमित्त ठाणे जिल्ह्यात विविध क्रीडा उपक्रम राबविण्याचे आवाहन

ठाणे (सम्यक कासारे) :- ऑलिम्पिकमधील पहिले पदक विजेते कुस्तीपटू खाशाबा जाधव यांचा जन्म दिन 15 जानेवारी हा दिवस राज्य क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येणार असून या निमित्ताने जिल्ह्यातील विविध संस्था, संघटनांनी ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान याविषयावरील व्याख्यान तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन, क्रीडा विषयक चर्चासत्रे, नविन खेळांविपयक चर्चासत्रे, क्रीडा प्रदर्शन, क्रीडा विषयक प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे. राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना करणे आणि जनतेत क्रीडाविषयक प्रोत्साहनात्मक वातावरण निर्माण होण्याच्या उद्देशाने राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दरवर्षी दि.१२ डिसेंबर ते १८ डिसेंबर या कालावधीत क्रीडा सप्ताह साजरा करण्यात यावे. तसेच महान क्रीडापटू दिवंगत मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी म्हणजेच दि.२९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात येतो. याच धर्तीवर सन १९५२ मध्ये हेलसिंकी, फिनलँड येथील ऑलिंपिक स्पर्धेत स्वतंत्र भारताचे पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक (कांस्य पदक) जिंकणाऱ्या महान कुस्तीपटू दिवंगत खाशाबा जाधव यांचे क्रीडा क्षेत्रातील



अतुलनीय योगदान विचारात घेता राज्यासोबतच देशाचा गौरव वाढविणाऱ्या कामगिरीस सातत्याने उजाळा मिळावा तसेच त्यातून राज्याच्या विद्यमान व नवीन खेळाडूंनी प्रेरणा घ्यावी यासाठी व त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून त्यांचा जन्मदिन दि. १५ जानेवारी हा दरवर्षी ''राज्य क्रीडा दिन'' म्हणून साजरा करण्यात यावा, असे निश्चित करण्यात आले आहे.त्यानुषंगाने ठाणे जिल्ह्यातील शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थाच्या तसेच शासनमान्य खाजगी अनुदानित, विनाअनुदानित व स्वंयअर्थसहाय्यित प्राथमिक व माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालये शासकीय तसेच शासनमान्य खाजगी विद्यापीठे, एकविध क्रीडा संस्था/असोसिएशन, क्रीडा मंडळे, क्रीडा अकादमी, शासनाच्या क्रीडा योजनांचा लाभ/अनुदान मिळालेल्या सर्व संस्था, अन्य संस्था/ मंडळे यांनी राज्य क्रीडा दिनानिमित्त ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांची जीवनगाथा व त्यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान याविषयावरील व्याख्यानांचे आयोजन करण्यात यावे. तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन, क्रीडा विषयक चर्चासत्रे, नविन खेळांविपयक चर्चासत्रे, क्रीडा प्रदर्शन, क्रीडा विषयक प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम आयोजित करण्यात यावे. तसेच महाराष्ट्राचे, भारत देशाचे नाव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरविलेल्या ठाणे जिल्ह्यातील खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क करण्याचे आवाहन प्र. जिल्हा क्रीडा अधिकारी रूही शिंगाडे यांनी केले आहे.

## मिरा भाईंदरमध्ये भटक्या मांजरांचे निर्बिजीकरण

भाईंदर (सतीश सोनावणे) : मिरा भाईंदर शहरात भटक्या श्वानासोबतच मांजरांचे निर्बिजीकरण प्रशासनाकडून हाती घेण्यात आले आहे. मागील तीन महिन्यात ७८ मांजरावर ही शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तर मांजराचे निर्बिजीकरण करणारी राज्यातील पहिली महापालिका असल्याचा दावा प्रशासनाचा दावा आहे.



मिरा भाईंदर शहरात जवळपास दहा हजाराहून अधिक मोकाट फिरणारी मांजरे आहेत. प्रामुख्याने ही मांजरे मासळी बाजार, चिकन शॉप, उद्यान, मैदान आणि गृह संकुल परिसर आवारात अधिक प्रमाणात दिसून येतात. वाढत्या मांजराच्या संख्येमुळे नागरिकांना विविध त्रासाला सामोरे जावे लागत आहे. यात मांजरांमुळे पसरणारी दुर्गंधी आणि धावत्या वाहनाखाली पिल्याच्या येण्याचा त्रास सर्वाधिक आहे.

त्यामुळे शहरातील भटक्या श्वानाची संख्या आटोक्यात आण्यासाठी त्यांचे निर्बिजीकरण करण्यात येत असताना त्यात मांजराचाही समावेश करण्याचा निर्णय प्रशासनाने पाच वर्षांपूर्वी घेतला होता.मात्र यंत्रणाचा अभाव असल्यामुळे प्रत्यक्ष या नियमांची अंमलबजावणी होत नव्हती.

## ठाणे महापालिका क्षेत्रात डिसेंबर महिन्यात हटवले ३८९१ अनधिकृत फलक

ठाणे (राकेश गायकवाड) : डिसेंबर-२०२४मध्ये ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व प्रभागांमधून ३८९१ अनधिकृत फलक, पोस्टर्स, बॅनर्स हटवण्यात आले. तर, ७६ प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अनधिकृत फलक हटवण्याची मोहीम सातत्याने सुरू ठेवण्याचे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.




ठाणे महापालिकेचा अतिक्रमण विभाग आणि प्रभाग समिती यांच्या मार्फत डिसेंबर महिन्यात ३८९१ अनधिकृत फलक, पोस्टर्स, बॅनर्स हटवण्यात आले. ही कारवाई सहाय्यक आयुक्तांमार्फत सातत्याने सुरू आहे. एकूण ७६ प्रकरणात गुन्हेही दाखल करण्यात आल्याची माहिती उपायुक्त (अतिक्रमण) शंकर पाटोळे यांनी दिली.

महापालिका क्षेत्राचे विद्रुपीकरण थांबवण्यासाठी दैनंदिन मोहीम राबवून अनधिकृत फलक हटवण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत, मा. उच्च न्यायालयाचेही अतिशय काटेकोर आदेश आहेत. त्याचे पालन सगळयांनी करावे. अनधिकृत पोस्टर, बॅनर, फलक लावला की त्यावर नोटीस आणि गुन्हे दाखल करणे ही कारवाई अतिशय प्रभावीपणे करण्यात यावी, असे निर्देश महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

| प्रभाग | हटवण्यात आलेले फलक | गुन्हे |
|---|---|---|
| ■ नौपाडा-कोपरी | - ७६२ | - ११ |
| ■ वागळे इस्टेट | - ३७३ | - ०२ |
| ■ लोकमान्य/सावरकर नगर | - ३४२ | - १० |
| ■ वर्तकनगर | - ४५३ | - ०६ |
| ■ माजिवडा-मानपाडा | - ३५३ | - ०७ |
| ■ उथळसर | - ३३८ | - ०३ |
| ■ मुंब्रा | - ४५६ | - १५ |
| ■ कळवा | - ४०९ | - १८ |
| दिवा | - ४०५ | - ०४ |

## एम.एल.म्हात्रे महाविद्यालयात पोलीस स्थापना दिवस “रेझिंग डे” निमित्त कार्यशाळा संपन्न

### विद्यार्थ्यांनी सायबर गुन्ह्यापासून सावधान राहावे व वाहतुकीचे नियम पाळावेत: वरिष्ठ पोलीस निरीक्षक नेताराम म्हस्के

ठाणे (रोहित जैसवाल) : कल्याण: (मनिलाल शिंपी) एम एल म्हात्रे महाविद्यालय आणि के.आर.माळदे इंग्लिश स्कूल रांजनोली, भिवंडी, जिल्हा ठाणे येथे आज, कोनगाव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नेताराम म्हस्के साहेब, वाहतूक पोलीस निरीक्षक श्री रुपनेर साहेब, psi अशान साहेब, यांचा प्रमुख उपस्थितीत प्राचार्य श्री.गोरखनाथ तरे यांचा अध्यक्षतेखाली “




“पोलीस स्थापना दिवस” निमित्त मार्गदर्शन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कोनगाव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री नेताराम मस्के यांनी विद्यार्थ्यांना ऑनलाइन फ्रॉड, सायबर गुन्ह्यापासून सावधान व त्या बाबत तत्काळ पोलीस स्टेशनला कॉल केल्यास तातडीने मदत केली जाईल असे सांगितले व विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारे कोणाचाही दबावाखाली न येता अशा प्रकारचे गुन्हे आढळून आल्यास त्वरित पोलीस स्टेशनला संपर्क साधावा अशी आव्हान देखील वाहतूक शाखेचे पीएसआय रूपकर साहेब व अशान ू वाहतुकीचे नियम पाळून अपघाताला आळा घालण्यासाठी विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे व वाहतुकीचे नियम पाळावेत असे आवाहन केले.यावेळी म्हात्रे महाविद्यालयाचे क्रीडा संचालक व आर एस पी चे ठाणे पालघर आणि नाशिक विभागाचे विभागीय समादेशक मनिलाल शिंपी यांनीही वाहतुकीचे नियम पाळा असे आवाहन केले, यावेळी डॉ.प्रा. कसबे सर, प्रा. दयानंद कांबळे, प्रा.माधव कांबळे, प्रा. शेटे सर, प्रा.जाधव सर, प्रा.विशाल सोनवणे, प्राचार्य सचिन ठाकरे, यांच्यासह महाविद्यालयाचे कार्यालयीन व्यवस्थापक श्री.रुपेश तरे यांनी विशेष सहकार्य केले.

**() थोडक्यात ()**


## ठाणे जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने दि. ७ जानेवारी रोजी महाराष्ट्र निर्यात संमेलनाचे आयोजन

ठाणे (जिमाका) - ठाणे जिल्हा उद्योग केंद्र यांच्यामार्फत दि.७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ९ वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, ठाणे येथे महाराष्ट्र निर्यात संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यातील लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) यांना निर्यात संबंधित योजना व उपक्रमांबद्दल माहिती देणे तसेच निर्यात तज्ज्ञांच्या मदतीने त्यांना मार्गदर्शन व सहकार्य प्रदान करणे हे या संमेलनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

हे संमेलन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार असून विकास आयुक्त (उद्योग) आणि महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा सेल (MAITRI) चे अध्यक्ष, राज्याचे निर्यात आयुक्त श्री.दीपेंद्र सिंह कुशवाह (भा.प्र.से.) उपस्थितांना मागदर्शन करणार आहेत.

## नववर्ष प्रारंभी केडीएमसी आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी केली कल्याण डोंबिवली परिसरातील प्रकल्पांची पाहणी



कल्याण : कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी नववर्षाच्या प्रारंभ म्हणजेच काल दिवसभर कल्याण डोंबिवली सुरु असलेल्या प्रकल्पांची पाहणी केली. यात सुरुवातीला त्यांनी कल्याणमधील भवानी चौक ते विठ्ठलवाडी स्टेशन उन्नत मार्ग, शक्ती धाम रुग्णालय, काटेमानिवली जलकुंभ आणि तिसगाव जलकुंभ येथे संबंधित अधिका-यांसमवेत पाहणी केली.

कल्याण (पूर्व) येथील आरक्षित इमारतीमध्ये (शक्तीधाम) ३० खाटांचे प्रसुतीगृह सुरु करण्यात आले असून, सदर प्रसुतीगृह मे.वेस्टर्न हेल्थ केअर कन्सल्टंन्सी या बाह्य संस्थेमार्फत विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स आणि इतर मनुष्यबळ वापरुन चालविण्यात येत आहे. सदर ठिकाणी सामान्य प्रसुती, सिजेरीयन शस्त्रक्रियेद्वारे प्रसुती इ. प्रसुती विषयक सेवा मोफत उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच इतर स्त्रीरोग विषयक सेवा महापालिकेच्या दरात उपलब्ध करुन देण्यात येत आहे. येथील बाह्यरुग्ण विभाग दि. ०२/१२/२०२४ पासून आणि आंतररुग्ण विभाग दि. ०९/१२/२०२४ पासून सुरु करण्यात आला आहे. महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी या प्रसुतीगृहास भेट देवून पाहणी केली व दाखल रुग्णांची विचारपूस केली तसेच बांधकाम विषयक कामे त्वरेने पूर्ण करणेबाबत संबंधित विभागाला निर्देश दिले. तसेच प्रसुतीगृहा बाहेर दर्शनी भागावर सुचनाफलक लावण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित अधिका-यांना दिले.

केंद्र सरकार व राज्य सरकार पुरुस्कृत अमृत अभियानांतर्गत कल्याण डोंबिवली शहरात सुरु असलेल्या १० जलकुंभांच्या कामापैकी काटेमानिवली आणि तिसगाव येथील जलकुंभांच्या कामाची पाहणी महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड़ यांनी करुन कामाच्या प्रगतीबाबत समाधान व्यक्त केले.

## शंभुदुर्ग संघटनेच्या वतीने आजोबा पर्वत येथे स्वच्छता अभियान उपक्रम हाती !



वासिंद (यश सावंत) - शंभुदुर्ग संघटना महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या वतीने आजोबा पर्वत येथे स्वच्छता अभियान उपक्रम राबविण्यात आले.

नवीन वर्षाच्या शुभारंभी शंभुदुर्ग संघटना पदाधिकारी यांनी तालुक्यातील डोळखांब येथील आजोबा पर्वत येथे श्री वाल्मिकी ऋषी यांची समाधी, सीतामाईचा पाळणा यांचे दर्शन घेऊन व कु.स्वरा संजय लोंढे यांच्या खड्या आवाजात छत्रपती शिवाजी महाराज यांची गारद देउन हि स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. तसेच सरकारने गडकिल्ले संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी समिती स्थापन करून धर्मरक्षण कायदा, गो हत्या व धर्म परिवर्तन कायदा याबाबत योग्य ती अमंलबजावणी करावी अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष आदेश चौधरी, सचिव संजय चौधरी, प्रसिद्धी प्रमुख संजय लोंढे, खजिनदार विलास जाधव, सागर मोरे, सागर महाले,विशाल निचिते, गणेश मते, मोहन डोहळे , गणेश मोगरे,संभाजी डोहळे, रुपेश भोईर यासह शेकडो शिवभक्तांनी सहभाग घेतला होता.

## आत्मा मालिक ध्यानपीठ मोहिली - अघईत तीन दिवसीय ध्यान योग शिबिर संपन्न !

वासिंद (विशाल पाटील) - येथील मोहिली-अघई विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट(कोकमठाण) संचालित,आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलात तीन दिवसीय ध्यान योग शिबिर संपन्न झाले.

आत्मा मालिक ध्यानयोग मिशन द्वारा , परमपूज्य सद्गुरू आत्मा मालिक माऊलीच्या कृपा आशिर्वादाने संत परिवाराच्या प्रेरणेतून तसेच समस्त विश्वस्त मंडळ व स्थनिक व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनाने आत्मा मालिक ध्यानपीठ मोहिली - अघई येथे तीनदिवसीय ध्यान योग शिबिर उत्साहात पार पडले.




या शिबिरात भजन, ध्यान साधन, हरिपाठ सत्संग , सदगुरू दर्शन व महाप्रसाद वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाच्या वेळी परमपूज्य सद्गुरु आत्मामालिक माऊलींच्या दिव्य सानिध्यात , संत परमानंद महाराज व समस्त संतानी मधुर वाणीने प्रवचन रुपी सेवा दिली. संत परिवाराच्या दिव्य सानिध्यामध्ये असंख्य साधक व आत्माप्रेमी भाविक तीन दिवसीय ध्यान योग शिबिराचा लाभ घेतला. सरत्या वर्षाला निरोप देत सत्संग समारोह असल्याने परमपूज्य सद्गुरु आत्मा मालिक माऊलींच्या दिव्य सानिध्यामध्ये आत्मप्रेमी भाविकांना सुख-शांती करिता ध्यानसाधना करण्याचा योग प्राप्त झाला.



या शिबिरावेळी संत भारत माता संस्थेचे सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, आत्मा मालिक ध्यानपिठाचे कार्याध्यक्ष तथा विश्वस्त उमेश जाधव, विश्वस्त उदय शिंदे, मोहन शेलार, प्रकाश भट, प्रकाश गिरमे, विलासराव पाटील, अभिजित पाटील, अनंत गायकवाड, प्रवीण मोरे , भारत सलगर, अलोकनाथ महाराज, ह.भ.प गोधडे महाराज आदी प्रमुख अतिथीसह असंख्य देश - विदेशातील आत्मप्रेमी व भाविक उपस्थित होते. यासाठी व्यवस्थापक प्राचार्य डॉ डी. डी. शिंदे, जनरल व्यवस्थापक उल्हास पाटील, सेवा व जनसंपर्क व्यवस्थापक गुलाब हिरे, आत्मा मालिक इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य कैलास थोरात, आत्मा मालिक इंग्लिश मिडीयम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य पंकज बडगुजर ,प्राध्यापक, विभाग प्रमुख सर्व शिक्षक आणि इतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

# ३५० कोटींचे बजेट अन् कमावले फक्त...; बायकोचा सिनेमा ब्लॉकबस्टर




२०२४ हे वर्ष भारतीय सिनेसृष्टीसाठी करोनानंतरच्या काही वर्षांपेक्षा चांगलं राहिलं. या वर्षभरात अनेक चित्रपटांनी बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई केली; दुसरीकडे काही चित्रपटांचं बजेट जास्त असूनही ते फ्लॉप ठरले. एका सुपरस्टारने प्रचंड पैसे खर्च करून तयार केलेला एक चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आदळला. तर या सुपरस्टारच्या पत्नीने मात्र ब्लॉकबस्टर सिनेमा दिला.

या दाक्षिणात्य अभिनेत्रीने २०२४ मध्ये एक सुपरहिट चित्रपट दिला, तर तिच्या पतीच्या महागड्या चित्रपटाला थिएटरमध्ये प्रेक्षक मिळाले नाही. कमाई तर सोडाच, हा चित्रपट निर्मिती खर्चही वसूल करू शकला नाही. ज्या सेलिब्रिटी जोडप्याबद्दल आम्ही बोलतोय, ते म्हणजे अभिनेत्री ज्योतिका आणि सूर्या होय.

ज्योतिकासाठी २०२४ हे वर्ष खूप खास राहिलं. तिचा 'शैतान' सिनेमा मार्च महिन्यात रिलीज झाला होता. हा भयपट होता. या चित्रपटातून तिने हिंदी सिनेविश्वात पुनरागमन केलं. या चित्रपटात ज्योतिकाने अभिनेता अजय देवगणच्या पत्नीची भूमिका केली होती. 'शैतान'चे दिग्दर्शन विकास बहलने केलं होतं. या चित्रपटात जानकी बोडीवाला महत्त्वाच्या भूमिकेत होती. तर यामध्ये आर माधवन खलनायकाच्या भूमिकेत होता. या चित्रपटाची कथा लोकांना फार आवडली आणि 'शैतान' ने बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई केली. हा गुजराती चित्रपटाचा रिमेक होता. याव्यतिरिक्त ज्योतिका 'श्रीकांत' सिनेमात झळकली होती, त्यानेही बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली होती.

**'शैतान' चे बजेट व कलेक्शन**

आयएमडीबीच्या वृत्तानुसार, ज्योतिका व अजय देवगणच्या 'शैतान' सिनेमाच्या निर्मितीसाठी तब्बल ९५ कोटी रुपयांचा खर्च निर्मात्यांनी केला होता. या चित्रपटाने देशभरात १७६.२ कोटी रुपयांची कमाई केली होती, तर जगभरात २१३.८ कोटी रुपये कमावले.

**सूर्याचा चित्रपट कोणता?**

ज्योतिकाचा पती व अभिनेता सूर्याचा फ्लॉप ठरलेला चित्रपट म्हणजे 'कंगुवा' होय. हा चित्रपट नोव्हेंबर महिन्यात रिलीज झाला होता. यात सूर्या मुख्य भूमिकेत होता. यामध्ये बॉलीवूड अभिनेता बॉबी देओल खलनायकाच्या भूमिकेत होता. सूर्या व बॉबी यांच्या सिनेमातील लूकची प्रचंड चर्चा झाली होती.

**'कंगुवा'चे बजेट व कलेक्शन**

सूर्याच्या 'कंगुवा'साठी निर्मात्यांनी खूप पैसा खर्च केला होता. तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण हा चित्रपट तब्बल ३५० कोटी रुपये खर्च करून तयार करण्यात आला होता. सिनेमा रिलीज होण्यापूर्वी त्याची खूप चर्चा होती, मात्र सिनेमागृहांमध्ये रिलीज झाल्यावर त्याकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवली. आयएमडीबीच्या वृत्तानुसार, सूर्याचा चित्रपट 'कंगुवा'ने भारतात ८१.४ कोटी रुपयांचे कलेक्शन केले. तर, जगभरात या चित्रपटाने १०५.२ कोटी रुपयांची कमाई केली. हा चित्रपट बजेटच्या निम्मीही कमाई करू शकला नाही आणि बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरला.

# 'तुला शिकवीन चांगलाच धडा'च्या दिग्दर्शकाने नव्या वर्षात दिली आनंदाची बातमी! सुरू केला क्लाउड किचन व्यवसाय



'तुला शिकवीन चांगलाच धडा' ही मालिका जवळपास गेली दोन वर्षे प्रेक्षकांचं भरभरून मनोरंजन करत आहे. या मालिकेतील अधिपती, अक्षरा, भुवनेश्वरी या सगळ्याच पात्रांनी प्रेक्षकांच्या मनात एक वेगळी जागा निर्माण केली आहे. पण, कोणत्याही मालिकेचं यश हे पडद्यावर काम करणाऱ्या कलाकारांप्रमाणे, पडद्यामागे कार्यरत असणाऱ्या मंडळींचं देखील असतं. 'तुला शिकवीन चांगलाच धडा', 'नवरी मिळे हिटलरला', 'रंग माझा वेगळा', 'प्रेमास रंग यावे' या गाजलेल्या मालिकांच्या दिग्दर्शनाची धुरा चंद्रकांत गायकवाड यांनी लिलया पेलली. पुरस्कार सोहळ्यामध्ये यासाठी त्यांचा सन्मान देखील करण्यात आलेला आहे.

पडद्यामागून गेली वर्षानुवर्षे प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन करणारे चंद्रकांत गायकवाड यांनी नव्या वर्षाच्या मुहूर्तावर आपल्या चाहत्यांना एक आनंदाची बातमी दिली आहे. अलीकडच्या काळात अनेक सेलिब्रिटी अर्थार्जनासाठी अभिनय क्षेत्रात जम बसून विविध व्यवसायाकडे वळत असल्याचं आपल्याला पाहायला मिळालं. २०२४ मध्ये श्रेया बुगडे, अनुष्का पिंपुटकर, अक्षया देवधर, मृणाल दुसानिस, रेश्मा शिंदे, तेजस्विनी पंडित, आशिष पाटील अशा अनेक कलाकारांनी व्यवसाय क्षेत्रात पदार्पण केलं. आता २०२५ च्या सुरुवातीला लोकप्रिय मालिकांच्या दिग्दर्शकाने व्यवसाय क्षेत्रात आपलं पाऊल टाकलं आहे. याबद्दल पोस्ट शेअर करत त्याने माहिती दिली आहे. चंद्रकांत गायकवाड यांनी मराठमोळे पदार्थ विकणारं क्लाउड किचन सुरू केलं आहे. त्यांच्या किचनचं नाव अन्नपूर्णा असणार आहे. "नवीन वर्षाची नवीन सुरुवात, गणपती बाप्पा मोरया! पारंपारिक जेवणाचं माहेरघर...अन्नपूर्णा." असं म्हणत दिग्दर्शकाने नव्या व्यवसायचं पोस्टर सोशल मीडियावर शेअर केलं आहे. दिग्दर्शकाच्या क्लाउड किचनमध्ये पोटभर जेवण ताट, गावसन जेवण ताट, कोकणी जेवण ताट, गोडधोड, सलाड असे पदार्थ मिळणार आहेत. क्लाउड किचन म्हणजे काय असा प्रश्न अनेकांना पडला असेल. क्लाउड किचन हे एक प्रकारचं हॉटेलचं असतं. पण, याचं संपूर्ण कामकाज ऑनलाइन पद्धतीने चालतं. खाद्यपदार्थांची चव आणि आधुनिक तंत्रज्ञान यावर हा व्यवसाय अवलंबून आहे. घरबसल्या आपल्याला क्लाउड किचनवरून ऑर्डर करता येते.

# लक्ष्मी निवास' फेम दिव्या पुगावकरची लगीनघाई!




२०२४ च्या वर्षाखेरीस अनेक मराठी कलाकारांनी लग्नगाठ बांधत नव्या आयुष्याला सुरुवात केली. रेश्मा शिंदे, शाल्व किंजवडेकर, किरण गायकवाड-वैष्णवी, निखिल राजेशिर्के असे बरेच कलाकार लग्नबंधनात अडकले. आता या पाठोपाठ मालिकाविश्वातील आणखी एक लोकप्रिय अभिनेत्री आपल्या आयुष्यातील नव्या प्रवासाला सुरुवात करणार आहे. 'मुलगी झाली हो', 'मन धागा धागा जोडते नवा' या मालिकांमधून घराघरांत लोकप्रिय झालेली अभिनेत्री दिव्या पुगावकर लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे.




दिव्या पुगावकरने इन्स्टाग्रामवर आपल्या लग्नपत्रिकेची लहानशी झलक शेअर करत ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली आहे. आपल्या चाहत्यांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत दिव्याने ती लवकरच लग्न करणार असल्याचं जाहीर केलं आहे. दिव्याने शेअर केलेल्या व्हिडीओवर 'अक्षय आणि दिव्या' असं कॅप्शन देण्यात आलं आहे. पण, अभिनेत्रीने यामध्ये कुठेही ती किती तारखेला लग्नबंधनात अडकणार याचा खुलासा केलेला नाही. त्यामुळे कमेंट्समध्ये काही कलाकारांसह नेटकऱ्यांनी सुद्धा 'तारीख सांग' अशी विचारणा दिव्याकडे केली आहे. अभिनेता सिद्धार्थ खिरीडच्या 'तारीख सांग' या कमेंटवर, दिव्याने 'कॉलवर सांगते' असा रिप्लाय दिला आहे.

दिव्याच्या होणाऱ्या नवऱ्याचं नाव अक्षय घरत असं आहे. या दोघांचा तिलक समारंभ १९ डिसेंबर २०२१ रोजी पार पडला होता. यानंतर अनेकदा अभिनेत्रीकडे ती लग्नबंधनात केव्हा अडकणार याबद्दल विचारणा केली जायची. यावर दिव्याने, "लवकरच लग्नाबद्दल खुलासा करेन" असं सांगितलं होतं. अखेर नव्या वर्षाच्या सुरुवातीला अभिनेत्रीने लवकरच लग्न करणार असल्याची गुडन्यूज चाहत्यांना पत्रिकेची झलक शेअर करत दिली आहे. दिव्याच्या होणाऱ्या नवऱ्याबद्दल सांगायचं झालं, तर अक्षय घरत फिटनेस मॉडेल म्हणून ओळखला जातो. त्याच्या इन्स्टाग्राम बायोमध्ये न्यूट्रिशनिस्ट, प्रोफेशनल फिटनेस ट्रेनर तसेच उद्योजक असं नमूद केलेलं आहे.

# 'सैराट' फेम तानाजी गाळगुंडेच्या गर्लफ्रेंडने दिली प्रेमाची कबुली?



२०१६ साली प्रदर्शित झालेल्या 'सैराट' चित्रपटात रिंकू राजगुरू व आकाश ठोसर मुख्य भूमिकेत होते. त्यांनी आर्ची व परश्या या भूमिका केल्या होत्या. या चित्रपटात परशाच्या मित्रांच्या भूमिका करणाऱ्या कलाकारांनी लक्ष वेधून घेतले होते. परश्याच्या 'लंगड्या' नावाच्या मित्राच्या भूमिकेत अभिनेता तानाजी गळगुंडे दिसला होता. तानाजी सध्या त्याच्या एका इन्स्टाग्राम पोस्टमुळे चर्चेत आहे.

तानाजी गळगुंडेने इन्स्टाग्रामवर एक स्टोरी रिपोस्ट केली आहे. ती मूळ स्टोरी प्रतिक्षा शेट्टी नावाच्या मुलीने पोस्ट केली आहे. स्टोरीतील फोटोमध्ये प्रतिक्षाने काढलेल्या सेल्फीमध्ये तानाजीदेखील दिसत आहे. नवीन वर्षात प्रवेश करताना असं कॅप्शन दिलं आहे. कॅप्शनमध्ये Entering 2025 with असं लिहून पुढे रेड हार्ट इमोजी पोस्ट केलेला आहे. तानाजीने रिपोस्ट केलेली ही स्टोरी व्हायरल झाली असून ही त्याची गर्लफ्रेंड आहे, अशी चर्चा होत आहे.


तानाजीने वेरुळमध्ये नवीन वर्षाचं स्वागत केलं. त्याच्याबरोबर प्रतिक्षादेखील होती. दोघांनीही वेरुळमधील काही फोटो त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर केले आहे. तानाजीबरोबर फोटोत असलेली प्रतीक्षा शेट्टी हिचा होममेड साबण बनवण्याचा व्यवसाय आहे. तसेच ती कपड्यांच्या ब्रँडसाठी मॉडेलिंग, फोटोशूटही करते असं तिच्या इन्स्टाग्राम पोस्टवरून दिसत आहे. एका मुलीबरोबर पाच-सहा वर्षांपासून रिलेशनशिपमध्ये असल्याचं तानाजीने सांगितलं होतं. स्टोरीमधील या फोटोचं कॅप्शन पाहून हिच तानाजीची गर्लफ्रेंड आहे, असं म्हटलं जात आहे.

**तानाजी गळगुंडेने रिपोस्ट केलेली स्टोरी**


तानाजीने एका मुलाखतीत त्याची गर्लफ्रेंड आहे असं सांगितलं होतं. पाच-सहा वर्षांपासून तिच्यासोबत असल्याचं तानाजीने सांगितलं होतं. जातव्यवस्थेवर भाष्य करताना तानाजीने त्याचं स्वतःचं उदाहरण दिलं होतं. "माझी गर्लफ्रेंड वेगळ्या जातीतली आहे. दोघेही वेगवेगळ्या जातीचे आहोत. मी जातीवाद मानत नाही. मी या सगळ्याच्या खूप पलीकडे गेलो आहे. नात्याला पाच-सहा वर्षे झाली पण मी घरी काहीच सांगितलं नाही. आम्ही दोघेही पुण्यात होतो आणि मी घरी काहीच सांगितलं नव्हतं. कारण त्यांना ते पटणार नव्हतं," असं तानाजी म्हणाला होता.

गर्लफ्रेंडने हट्ट केल्याने आईला तिच्याबद्दल सांगितलं. पण आईला समजल्यावर ती खूप भांडली. याउलट त्याच्या गर्लफ्रेंडच्या घरचे पुढारलेले असून त्यांना या नात्याबद्दल काहीच आक्षेप नसल्याचं तानाजीने 'आरपार' चॅनलला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं होतं.

# लग्नाआधीच प्रेग्नेन्सीमुळे राहिली चर्चेत, 'ही' बॉलीवूड अभिनेत्री दुसऱ्यांदा होणार आई?



सध्या सगळीकडे २०२५ या नवीन वर्षाचा उत्साह पाहायला मिळत आहे. अनेक सेलिब्रिटी २०२४ या वर्षातील काही खास आठवणी शेअर करत नववर्षाचं स्वागत करताना दिसत आहेत. मात्र एका बॉलीवूड अभिनेत्रीने शेअर केलेला व्हिडीओ पाहिल्यानंतर ती दुसऱ्यांदा आई होणार असल्याच्या चर्चांना सोशल मीडियावर उधाण आलं आहे. कारण तिने पोस्ट केलेल्या व्हिडीओत तिचा एक फोटो आहे, ज्यात तिच्या हातात प्रेग्नेंसी टेस्ट किट दिसत आहे. 'बर्फी' फेम बॉलीवूड अभिनेत्री इलियाना डिक्रुझ तिच्या पोस्टमुळे चर्चेत आली आहे. इलियानाने सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर करून २०२४ ची खास झलक दाखवली. इलियानने शेअर केलेल्या व्हिडीओ जानेवारी ते डिसेंबर या १२ महिन्यांमधील खास क्षणांची झलक पाहायला मिळतेय. काही महिन्यांमध्ये ती व तिचा पती बाळाबरोबर वेळ घालवताना दिसतात. तर काही फोटोंमध्ये व्हेकेशनची झलक पाहायला मिळतेय. काहींमध्ये तिचा वर्षभराचा मुलगा चालायला शिकला, तेव्हाचे सुंदर क्षण आहेत. इलियानाच्या व्हिडीओत ऑक्टोबर महिन्यात ती हातात प्रेग्नेंसी टेस्ट किट घेऊन दिसत आहे. यानंतर ती दुसऱ्यांदा आई होणार असल्याची चर्चा होत आहे. इलियानाच्या या पोस्टवर चाहते कमेंट्स करून तिला शुभेच्छा देत आहेत. इलियाना डिक्रुझच्या जोडीदाराचे नाव मायकल डोलन आहे. त्यांनी गुपचूप लग्न केलं होतं, असं म्हटलं जातं. पण इलियाना किंवा मायकलने याबद्दल कधीच प्रतिक्रिया दिलेली नाही. इलियानाने ती आई होणार असल्याची घोषणा केल्यावर तिच्या लग्नाबद्दल चर्चा सुरू झाल्या होत्या. त्यानंतर तिने जोडीदार मायकल डोलनचे काही फोटो शेअर केले होते. हे दोघेही ऑगस्ट २०२३ मध्ये आई बाबा झाले. त्यांच्या मुलाचे नाव कोआ फीनिक्स डोलन आहे. इलियाना अनेकदा मुलाचे व पतीचे फोटो सोशल मीडियावर शेअर करत असते.



# सिद्धार्थ चांदेकर व मिताली मयेकरचा पहिला चित्रपट!

सिद्धार्थ चांदेकर आणि मिताली मयेकर यांच्याकडे मराठी कलाविश्वातील आदर्श जोडपं म्हणून पाहिलं जातं. या दोघांचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. एकमेकांना अनेक वर्षे डेट केल्यावर सिद्धार्थ-मितालीने २०२१ मध्ये लग्नगाठ बांधली. ही रोमँटिक जोडी ऑनस्क्रीन एकत्र केव्हा झळकणार याची चाहते आतुरतेने वाट पाहत होते. अखेर नव्या वर्षात या दोघांनीही चाहत्यांना आनंदाची बातमी देत त्यांच्या पहिल्या चित्रपटाची घोषणा केली आहे.

सिद्धार्थ चांदेकर आणि मिताली मयेकर हेमंत ढोमे दिग्दर्शित 'फसक्लास दाभाडे' चित्रपटात एकत्र स्क्रीन शेअर करणार आहेत. 'फसक्लास दाभाडे' या चित्रपटाचा टीझर काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झाला होता. चित्रपटाचा कौटुंबिक टीझर पाहून प्रेक्षकांच्या मनावर एक वेगळी छाप उमटली आहे.




**मेष** – महत्त्वाची रेंगाळलेली कामे होतील. उत्साह वाढेल. नाराज झालेल्यांना खूश करता येईल. धंदा वाढेल. प्रकृतीची काळजी घ्यावी.

**वृषभ** – अनुभवी माणसांचा सल्ला उपयोगी येईल. सर्वांचे सहाय्य घेता येईल. मोठ्यांचा मान राखा. मैत्री होईल. सावधपणे गुंतवणूक करावी.

**मिथुन** – व्यवसाय, नोकरीत प्रतिष्ठा प्राप्त होईल. नवीन योजना राबवता येतील. नवीन ओळख झाली तरी मोहात पडू नका. सावध राहा.

**कर्क** – आपल्या धंद्यात वाढ करू शकाल. तुमचा विचार इतरांना पटवून देता येईल. कठीण काम करा. निष्कारण वाद वाढवू नका.

**सिंह** – व्यवसायात अनुकूल ग्रहमान राहील. अडचणींवर मात करू शकाल. नवीन संधी उपलब्ध होतील. आपल्या रागावर ताबा ठेवावा.

**कन्या** – गैरसमज टाळण्याचा प्रयत्न करावा. आपला प्रभाव पडेल. आपल्या धंद्यात वाढ होईल. भागीदाराबरोबर चर्चा यशस्वी होईल.

**तूळ** – कौटुंबिक समस्या सोडवाल. नातेवाईकांशी, आप्तेष्टांशी भेटीचे योग आहेत. कुणालाही कमी लेखू नका. तुमचे विचार योग्य ठरतील.

**वृश्चिक** – नोकरीत वरिष्ठांची मदत मिळेल. नवीन काम मिळवता येईल. खर्चावर बंधने घाला. राग वाढवू नका. सर्वांशी सुसंवाद राहील.

**धनु** – धंद्यात फायद्याचे काम मिळेल. कुठल्याही स्वरूपाचे वादविवाद टाळावेत. चर्चा यशस्वी होईल. निर्णय अचूक ठरेल. जुने मित्र भेटतील.

**मकर** – कामात तत्परता दाखवाल. आपला प्रभाव पडेल. स्पर्धा जिंकता येईल. ओळखी वाढतील. वसुली करा. भावंडांशी वादविवाद टाळावेत.

**कुंभ** – आर्थिक स्थिरता लाभेल. अनेक कामे करण्याचा प्रयत्न त्रासदायक ठरेल. मनाची द्विधा अवस्था होईल. वेळेनुसार निर्णय घ्या.

**मीन** – महत्त्वाचा निर्णय घेताना सर्वांचा विचार करा. आपल्या कामातील अडचणी कमी होतील. अरेरावी करू नका. नेहमी नम्रपणे बोला.

# महाराष्ट्राचे पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण तयार करा




**मुंबई (यश सावंत) :** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राने दिशादर्शक व्हावे, यासाठी राज्याचे पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण तयार करण्याचे निर्देश माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी बुधवारी दिले. 'एआय' तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उद्योग-व्यवसाय उभे राहतील. तरुणांना रोजगार मिळतील व तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्र सक्षमपणे स्पर्धा करू शकेल, असे शेलार यांनी सांगितले.

शेलार यांनी सह्याद्री अतिथीगृहावर घेतलेल्या आढावा बैठकीस सचिव पराग जैन नैनुटिया, 'महाआयटी'च्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मार्च २०२४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'इंडिया एआय मिशन'अंतर्गत देशभरात 'एआय' क्षमता वाढवण्यासाठी १० हजार ३७२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यात इंडिया एआय डेटासेट्स प्लॅटफॉर्म, ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट प्रकल्प, ग्राफिक प्रोसेसिंग युनिट्स, इंडिया एआय इनोव्हेशन सेंटर, फ्युचर स्किल्स प्रोग्राम आणि एआय क्षेत्रातील स्टार्टअप्ससाठी वित्तपुरवठा आदींचा समावेश आहे.

# बांधकाम परवानगीचे प्रस्ताव आता ऑनलाईनच

**नाशिक (सचिन कदम)** – विकसन अर्थात बांधकाम परवानगीचे प्रस्ताव नव्या वर्षात केवळ ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहेत. तांत्रिक अडचणीचे कारण देऊन ही प्रकरणे विकासकांच्या मागणीनुसार मनपा आयुक्तांच्या मान्यतेने ऑफलाईन स्वीकारण्यास मान्यता दिली गेली होती. नव्या निर्णयामुळे त्यावर फुली मारण्यात आली आहे.या संदर्भातील आदेश महापालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक मनिषा खत्री यांनी काढले असून त्याची




काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत. एकिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली- २०२० संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे. त्यानुसार विकसन परवानगी देण्यासाठी शासनाने बीपीएमएस कार्यप्रणाली विकसित केली आहे. त्यामार्फत विकसन परवानगी प्रस्ताव मंजुरीची कार्यवाही होणे अपेक्षित आहे. महाालिका या प्रणालीद्वारे विकसन प्रस्ताव मंजुरीची कार्यवाही करते. परंतु, बीपीएमएस प्रणालीव्दारे प्रस्ताव सादर करताना काही प्रकरणांमध्ये तांत्रिक अडचणी येत होत्या. अशावेळी ती प्रकरणे आयुक्तांच्या मान्यतेने ऑफलाईन पद्धतीने सादर करण्यास परवानगी दिली जात होती. नव्या सूचनेने ही पद्धत आता बंद करण्यात आली. शासनाच्या बीपीएमएस कार्यप्रणालीतून विकसन परवानगी प्रस्ताव मंजुरीची कार्यवाही होणे अपेक्षित आहे. त्यामुळे एक जानेवारी २०२५ पासून नगरनियोजन विभागाकडून दिल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या विकसन परवानगीबाबतचे प्रस्ताव फक्त ऑनलाईन पद्धतीने सादर करावेत, असे आयुक्त खत्री यांनी सूचित केले आहे. मनपा आयुक्तपदाचा कार्यभार स्वीकारताना मनिषा खत्री यांनी शासकीय प्रणालींचा वापर करण्याचे स्पष्ट केले होते. ऑनलाईन बांधकाम परवानग्यांचा विषय मागील दोन ते तीन वर्षांपासून चर्चेत आहे. बराच काल लोटूनही तांत्रिक अडचणींचे कारण देत हे प्रस्ताव ऑफलाईन रेटले जात होते. नव्या निर्णयाने त्यास चाप बसणार आहे.

SPORT

## Shubman Gill IN, Rohit Sharma Dropped! Speculations Rife As India's Practice Session Hints At Historic Snub




**New Delhi - India captain Rohit Sharma could be dropped from the playing XI for the fifth Test against Australia at the Sydney Cricket Ground. The speculations were fueled after coach Gautam Gambhir refused to confirm Rohit Sharma's place in the XI. When asked why Rohit was absent from the pre-match conference and if he'd feature in the XI, Gambhir said a coach's presence should be good enough, adding that a call on the XI would be taken after looking at the pitch and conditions.**

Rohit Sharma mustered only 31 runs in three Tests in the Border-Gavaskar Trophy which sparked outrage against the skipper as the calls for axe grew louder. While the coach stayed mum on the captain's potential snub from the XI, India's practice session did drop a few hints. Rohit Sharma wasn't practicing slip catching, with Virat Kohli, KL Rahul, and Nitish Reddy taking charge. Another massive hint about Rohit's potential axe was his absence from the net session. While the likes of Yashasvi Jaiswal, Virat Kohli, KL Rahul, and Ravindra Jadeja batted, Rohit did not come for the session at the time of writing. Shubman Gill, Dhruv Jurel, and Rishabh Pant also came out with their pads on. If Rohit Sharma is dropped, Shubman Gill is most likely to replace him in the XI. Gill was dropped from the fourth Test after poor returns in the first three Tests.If Rohit misses out on a berth at the SCG, Jasprit Bumrah will lead the side in the final Test. Bumrah led the team in Rohit Sharma's absence in Perth as India scripted history after picking an emphatic 295-run win. India are 2-1 behind in the series and must ensure a win at SCG to retain the Border-Gavaskar Trophy. A win in Sydney will also keep India's WTC final hopes alive.

## Emma Raducanu pulls out of Australian Open warmup with back niggle

**New Delhi -** Grand Slam champion Emma Raducanu has withdrawn from the Auckland Open due to a back injury, dealing a blow to her preparations for the Australian Open. The 22-year-old British tennis player was scheduled to face Robin Montgomery of the United States in the first round of the ASB Classic on Tuesday. However, Raducanu has decided to travel to Melbourne to continue her preparations for the Australian Open, which begins on January 12. Raducanu, a Grand Slam champion and sixth seed at the Auckland warm-up event, expressed her disappointment in a statement:"I've tried my best to be ready. I love Auckland and the fans here, but unfortunately, I've picked up a back niggle and won't be ready in time." Since her remarkable US Open victory in 2021, Raducanu has faced persistent injury setbacks. This year, she skipped five tournaments in the WTA's Asia swing after spraining ligaments in her foot. Additionally, she spent much of the previous season recovering from ankle and wrist surgeries.The 22-year-old managed to play only three matches after the Seoul injury in September, all of which she won while representing Great Britain at the Billie Jean King Cup Finals. Despite this success, she heads into the Australian Open without any recent match practice.



# Big blow to India, star player ruled out of 5th Test against Australia in Sydney, head coach Gautam Gambhir confirms


**New Delhi -** In a big setback to Team India, their star pacer Akash Deep has been ruled out of the fifth and last Test against Australia at the Sydney Cricket Ground (SCG). India's head coach Gautam Gambhir confirmed the news during pre-match press conference on January 2. Notably India and Australia will lock horns with each other one last time in the ongoing Border-Gavaskar Trophy at the SCG on January 3. Gambhir revealed that Akash Deep will miss the last Test due to stiff back.

"Akash Deep is out with back issue," India coach Gautam Gambhir said in the pre-match press conference.

Notably, Akash Deep picked five wickets in two matches that he played in the ongoing Test series against Australia.

The 28-year-old right-arm pacer has been experiencing a niggle, which could be attributed to the heavy workload he has undertaken in the series. He bowled a total of 87.5 overs across two Test matches.

**ALSO READ:** Australia announce playing XI for Sydney Test against India, star player dropped, suspense over Mitchell Starc ends; 31-yr-old to make debut




ALSO READ: Gautam Gambhir breaks silence on leaked dressing room talks ahead of Sydney Test, says 'Debates between coach and player...'In Akash Deep's absence, one of the players between Harshit Rana or Prasidh Krishna could be considered as his replacements in India's playing XI for the all-important Sydney Test.

Coach Gambhir was also asked about Rohit Sharma's spot in India's playing XI for the series ender, to which he remained tightlipped and said that it will be decided after taking a look at the pitch.

We are going to have a look at the wicket and announce the playing XI tomorrow," Gambhir added. Australia have announced their playing XI for the fifth Test against India with big changes. Australia have dropped Mitchell Marsh and replaced him with Beau Webster, who will be making his debut in Sydney. Meanwhile, Mitchell Starc has been declared fit to feature in the final showdown in Sydney. Sam Konstas, Usman Khawaja, Marnus Labuschagne, Steve Smith, Travis Head, Beau Webster, Alex Carey (wk), Pat Cummins (captain), Mitch Starc, Nathan Lyon, Scott Boland.

India haven't enjoyed best of the outing in the series so far. After starting the tour on a high with resounding 195-run win over Australia in series opener in Perth, India lost two matches followed by a draw. It will be a must-win contest for India in Sydney if they want to boost their slim WTC final chances.

## Rohit Sharma dropped? Coach Gambhir tight-lipped over captain's spot in XI for SCG Test




**New Delhi -** India coach Gautam Gambhir did not confirm whether captain Rohit Sharma would play in the Sydney Test against Australia when asked directly about his inclusion. Rohit was seen during warm-ups, shadow-practicing his drives while kicking a football around with his teammates. However, when questioned about Rohit's availability, Gambhir stated that the team has not yet finalised their playing XI and will make the decision tomorrow after assessing the pitch.Notably, India have made several surprising selection decisions throughout the series against Australia. In Perth, they opted for Washington Sundar as the lone spinner, only to replace him with Ravichandran Ashwin in the next match and then Ravindra Jadeja in Brisbane. Fast bowler Harshit Rana made his debut in Perth but was benched after struggling in the Adelaide Pink Ball Test. The experimentation continued in Melbourne, where India fielded three all-rounders Nitish Reddy, Ravindra Jadeja, and Washington Sundar while Shubman Gill was dropped. Under-fire captain Rohit Sharma chose to open the innings in place of KL Rahul, who was shifted to the No. 3 position.

## India's WTC Final Odds Spike After Pat Cummins' Massive Decision For Sri Lanka Tour

**New Delhi -** The defeat to Australia in the Boxing Day Test at the MCG dented India's hopes of reaching the WTC final. South Africa's win over Pakistan sealed a spot for the Proteas in the WTC final, leaving India and Australia on a knife edge for the second berth. India for most of the WTC cycle looked certain to play the final, but the 3-0 whitewash against New Zealand at home followed by defeats in Adelaide and Sydney pegged them back. The Rohit Sharma-led side




needs a win in Sydney to keep the hopes alive. A win alone, however, won't be enough for team India as they would need Sri Lanka to beat Australia 2-0 in the upcoming series. Australia are a brute force and beating them won't be easy for the Lankans, however, they received a major boost after Pat Cummins confirmed his decision to skip the tour. A weakened Australian team would also benefit India indirectly who would be looking up to Sri Lanka to help them qualify for the WTC final. Cummins confirmed that the recent death of his mother and the birth of his second child contributed to his decision to skip the Sri Lanka tour. The Australia captain revealed that the death of his mother last year changed his priorities in life as he learned that family always comes first."In some ways it really makes you focus in on what I think is important," he told the Daily Telegraph at the launch of the Pink Test. "It's family, it's enjoyment, it's trying to find joy in life and I think that's been a slight shift in the way I've approached playing and touring and it's just given me that real decluttering mindset," he added."When you go out you just want to play well and of course there's going to be pressure, but you don't want to forget that what mum and dad used to say to us every time we went and played as kids, was to go and enjoy it. Try your best, but make sure you enjoy it. I try and remind myself of that every time I go on a tour or play," Cummins said.

# शेत जमिनीतील वाढते प्रदूषक रोखणाऱ्या जीवाणूंचा शोध

## आयआयटी मुंबईतील संशोधकांमुळे जमीन होणार सुपीक




● मुंबई, विशाल कारंडे :

**रासायनिक कीटकनाशके पिकांचे कीटकांपासून संरक्षण करीत असली तरी त्यांच्या वाढत्या वापरामुळे नैसर्गिक संसाधने प्रदूषित होत आहेत. याचा पिकांच्या वाढीवर, तसेच जमिनीच्या सुपिकतेवर परिणाम होत आहे. या वाढत्या प्रदूषणाच्या समस्येवर आयआयटी मुंबईच्या संशोधकांनी मातीतील विषारी प्रदूषकांचे सेवन करून उपयुक्त पोषक तत्वे तयार करणाऱ्या जीवाणूंचा शोध लावला आहे.**

कृषीक्षेत्रासमोर कीटकनाशके आणि तणनाशके यांच्या रूपात असलेली अरोमॅटिक संयुगे मोठी समस्या आहे. ही संयुगे विषाक्त (टॉक्सिक) असून बियाण्यांना अंकुर फुटू देत नाहीत, वनस्पतींची वाढ रोखतात, बियाणे आणि वनस्पतींमध्ये साठून राहतात. पारंपरिक पद्धतीने ही प्रदूषके काढण्यासाठी केलेले रासायनिक उपचार किंवा माती काढून टाकणे हा पर्याय तात्पुरता ठरतो. यावर आयआयटी मुंबईच्या संशोधकांनी प्रदूषित वातावरणातील जीवाणूंचा शोध घेतला आहे. यातील काही जीवाणूंच्या प्रजाती विशेषतः स्यूडोमोनास आणि एसिनेटोबॅक्टर हे अरोमॅटिक संयुगांचे विघटन करतात.

ते प्रदूषकांचे भक्षण करून त्यांचे साध्या, निरुपद्रवी आणि बिन-विषारी संयुगात विघटन करून प्रदूषित पर्यावरण नैसर्गिकरित्या स्वच्छ करतात. हे जीवाणू फॉस्फोरस आणि पोटॅशिअमसारख्या पोषकतत्वांना द्रवणीय रूपात बदलत असल्याने वनस्पतींना सहजपणे उपलब्ध होतात. तसेच हे जीवाणू इंडोल असेटिक आम्ल तयार करीत असल्याने वनस्पतीची वाढ होते. हे जीवाणू माती स्वच्छ करण्याबरोबरच सुपीकता वाढवते आणि वनस्पतींना निरोगी आणि सुदृढ बनवतात, असा दावा आयआयटी मुंबईच्या जैवविज्ञान आणि जैवअभियांत्रिकी विभागाचे प्रा. प्रशांत फळे यांनी केला आहे. प्रा. फळे त्यांच्या मार्गदर्शनाखाली संदेश पापडे यांनी पीएच.डी.साठी हे संशोधन केले. एन्व्हायर्नमेंटल टेक्नॉलॉजी अँड इनोव्हेशन या नियतकालिकात अलिकडे हे संशोधन प्रकाशित झाले आहे.

### पिकांची वाढ, उत्पन्नात वाढ

■ गहू, मुगाच्या शेंगा, पालक, मेथी इत्यादी पिकांसाठी स्यूडोमोनास आणि एसिनेटोबॅक्टर या जीवाणूंच्या मिश्रणाचा वापर करण्यात आला. या मिश्रणामुळे पिकांची वाढ आणि उत्पन्नात ४५ ते ५० टक्क्यांनी वाढ झाली. काही प्रजाती प्रदूषकांचा नाश करतात, काही पिकांच्या वाढीसाठी, तर काही रोगांपासून संरक्षण करतात. यांना एकत्रित केल्यामुळे निर्माण झालेले जीवाणूंचे दल अनेक कार्य एकाच वेळी सक्षमपणे करतात, असे प्रा. फळे यांचे म्हणणे आहे.

### बुरशीजन्य संसर्ग रोखण्यासही मदत

■ संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेनुसार मानवासाठी उपयुक्त अशा १६८ पिकांना बुरशीची लागण होते. यामुळे जगभरात दरवर्षी १०-२३ टक्के पिकांचे नुकसान होते. आयआयटी मुंबईच्या अभ्यासाने या समस्येवरही उपाय शोधला आहे. हे उपयुक्त जीवाणू बुरशीला मारू शकणारे लायटिक एन्झाईम आणि हायड्रोजन सायनाइडसारखे पदार्थ तयार करतात, असे प्रा. फळे यांनी सांगितले.

# आई एकविरा गडावर भाविकांवर मधमाशांचा हल्ला

● लोणावळा, सुचिता देशमुख :



लोणावळ्यातील आई एकविरा गडावर मधमाशांनी अचानक भाविकांवर हल्ला करत चावा घेतला. ही घटना नूतन वर्षाच्या पहिल्याच दिवशी दुपारी घडली. आई एकवीरा गडावर भाविकांच्या पालखीसोबत असणाऱ्या धुपबत्तीमुळे ज्यात रसायनिक घटकांचा समावेश असू शकतो यामुळे मधमाशांनी हल्ला केल्याचं सांगितलं जात आहे. मधमाशांनी हल्ला केल्यानंतर भाविकांना खाली बसावं लागलं. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर सध्या वायरल होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नूतन वर्षाच्या पहिल्याच दिवशी अनेक जण आई एकविरा च्या दर्शनासाठी भाविकांनी रांग लावली होती. दरम्यान, मुंबईच्या कुलाबा येथून काहीजण देवीची पालखी घेऊन आले होते. पालखीतील धूपबत्ती लावल्याने त्यातून निघालेल्या धुरामुळे मधमाशांनी भाविकांवर हल्ला केल्याचं सांगण्यात आलं आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

# पिंजऱ्यात अडकलेल्या बछड्याची सुटका

● नाशिक, सचिन कदम :



बछडा पिंजऱ्यात अडकल्यानंतर मादी बिबट्याने परिसरात डरकाळ्या फोडणे सुरु केल्याने वनविभागाला मातृप्रेमापुढे माघार घेत बछड्याला मुक्त करावे लागले. नाशिकरोडच्या हंडोरे मळा परिसरात ही घटना घडली.२६ डिसेंबर रोजी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास ऋषिकेश चंद्रे (चार) हंडोरे मळा येथील पत्र्याच्या शेडबाहेर खेळत असताना बिबट्याने त्याच्यावर हल्ला केला. बिबट्या त्याला फरफटत नेत असताना ऋषिकेशचे वडील प्रकाश चंद्रे यांनी बिबट्यावर झडप घालत त्याचे मागचे पाय धरून ठेवत आरडाओरड केली. त्यामुळे बिबट्याने ऋषिकेशला सोडून पळ काढला. गंभीर जखमी झालेल्या ऋषिकेशला बिटको आणि नंतर जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेनंतर माजी नगरसेवक जगदीश पवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा पदाधिकारी विक्रम कोठुळे यांनी वनविभागाकडे या ठिकाणी पिंजरा लावण्याची मागणी के लीहोती. त्यानंतर वन विभागाने पिंजरा लावला. बुधवारी साडेसातच्या सुमारास पिंजऱ्याच्या दिशेने आवाज येऊ लागला.

# नाताळच्या सुट्टीत मुंबई महापालिकेला महसूल भेट



● मुंबई, विशाल पाटील :

नाताळनिमित्त शाळांना पडलेल्या सुट्ट्यांमध्ये भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालय (राणीची बाग) पर्यटकांनी गजबजली. मुलांना बागेतील प्राणिसंपदा, वनस्पती आणि विविध झाडांची ओळख व्हावी, याहेतूने बहुतांश पालकांनी राणीच्या बागेला पसंती दिली. केवळ सहा दिवसांत ९७ हजार पर्यटकांनी राणीच्या बागेला भेट दिल्यामुळे महापालिकेच्या तिजोरीत तब्बल ३५ लाख रुपयांहून अधिक महसूल जमा झाला. रविवारी सर्वाधिक म्हणजेच सुमारे २ लाख पर्यटकांनी राणीच्या बागेला भेट दिली. त्यातून पालिकेला १० लाख रुपये महसूल मिळाला.दुर्मिळ जातीच्या वनस्पती, पक्षांचा किलबिलाट, विविध प्राण्यांचा वावर आदींमुळे राणीच्या बागेत कायमच पर्यटकांची गर्दी असते. प्राण्यांविषयी असलेल्या कुतूहलापोटी लहान मुले राणीच्या बागेत जाण्यासाठी पालकांकडे हट्ट करतात. गेल्या काही वर्षात राणीच्या बागेत नवनवीन प्राणी – पक्ष्यांची संख्या वाढल्यामुळे त्यांना पाहण्यासाठी मोठ्या संख्येने पर्यटक राणीच्या बागेला भेट देत आहेत. यंदा नाताळनिमित्त शाळांना सुट्ट्या पडल्यामुळे अनेकजण मुंबईबाहेर गेले आहेत. मात्र, अनेकांनी मुंबईत राहूनच नववर्षाचा आनंद साजरा करण्यासाठी विविध बेत आखले. त्यानुसार, नागरिकांनी निसर्ग आणि प्राण्यांच्या सानिध्यात वेळ घालवण्यासाठी राणीच्या बागेची निवड केली. २५ डिसेंबर ते ३१ डिसेंबरदरम्यान एकूण ९७ हजार ५८६ पर्यटकांनी राणीच्या बागेला भेट दिली. नाताळनिमित्त २५ डिसेंबर रोजी राणीची बाग पर्यटकांसाठी खुली ठेवण्यात आली होती. दुसऱ्या दिवशी २६ डिसेंबर रोजी राणीची बागा बंद ठेवण्यात आली होती. त्यामुळे २६ डिसेंबर वगळता अन्य सहा दिवसांत पर्यटकांनी दिलेल्या भेटीतून एकूण ३५ लाख ८१ हजार ८९५ रुपये महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला. पालिकेच्या तिजोरीत २९ डिसेंबर रोजी सर्वाधिक म्हणजेच १० लाख ४ हजार ३९० रुपये जमा झाले. तर, नववर्षाच्या पूर्वसंध्येला सर्वात कमी म्हणजेच ४ लाख ३० हजार २५० रुपये पालिकेला प्राप्त झाले.

# मुक्त विद्यापीठात गझल संध्या, तर दुसरीकडे विद्यार्थ्यांच्या शुल्कात ७५ टक्के वाढ

● नागपूर, नितीन देवळेकर :

नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने २०२३ शैक्षणिक वर्षापासून विविध अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्कात प्रचंड वाढ केली होती. जवळपास ३५ ते ७५ टक्के असलेल्या शुल्कवाढीचा फटका गरीब विद्यार्थ्यांना बसला. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने बी.ए.-१ व बी.कॉम.-१ चे शैक्षणिक शुल्क रु.१७०२ वरून रु.२९८८ करण्यात आले आहे.बी.एस.सी.च्या अभ्यासक्रमात ५५ टक्के, डी.सी.एम.च्या अभ्यासक्रमात ३५ टक्के, एम.ए. अभ्यासक्रमांत ३६ टक्के अशी जवळपास सर्वांचे अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक शुल्कात फार मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

विद्यापीठातील एकूण विद्यार्थ्यांपैकी ५० टक्क्याहून जास्त विद्यार्थी हे बी.ए. व बी.कॉम. अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतात. त्यामुळे याच अभ्यासक्रमांमध्ये मुक्त विद्यापीठाने नेमकी ७५ टक्के शैक्षणिक शुल्का मध्ये वाढ केल्याने, समाजातील गरीब विद्यार्थी, जे पारंपरिक विद्यापीठांमध्ये प्रवेश घेऊ शकत नाही,ते मुक्त विद्यापीठामध्ये पण पैशाअभावी प्रवेश घेऊ शकणार नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र आता मुक्त विद्यापीठाचा नवा प्रकार समोर आला आहे. एकीकडे विद्यापीठ विद्यार्थ्यांचे शुल्क वाढवते तर दुसरीकडे गझल कार्यक्रम घेऊन या अवास्तव खर्च करत असल्याची बाब समोर आली आहे.




### कार्यक्रमावर उधळपट्टी का?

■ भरीस भर म्हणून २०२३ च्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढलेले प्रवेश शुल्क एकाच वेळी भरण्याचे निर्देश विद्यापीठाने दिले होते. यापूर्वी दोन टप्प्यात प्रवेश शुल्क भरण्याची मुभा विद्यार्थ्यांना होती. प्रवेश शुल्क एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढल्याची बाब असो की एकाच टप्प्यात प्रवेश शुल्क भरण्याची अट असो, त्यामुळे आर्थिक परिस्थिती अगदी बेताची असलेले विद्यार्थी लाभ घेऊ शकत नाही. अशी गंभीर परिस्थिती असताना मुक्त विद्यापीठाने मनोरंजनाच्या कार्यक्रमाचा खर्च का वाढवला अस प्रश्न उपस्थित केला जात आहे.

### काय आहे कार्यक्रम?

■ मराठी शायरीचे नामवंत शायर स्व. भाऊसाहेब पाटणकर यांचे स्मरणार्थ व नववर्षाच्या स्वागतानिमित्त बुधवार १ जानेवारी रोजी मुकुंद दीक्षित यांचा गझल सादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम शैक्षणिक इमारतीतील सभागृहात झाला. या प्रसंगी विशेष अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्रकुलगुरू, डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन उपस्थित होते. तसेच प्राधिकरण सदस्य आणि इतरांना ही या कार्यक्रमाला बोलावण्यात आले होते. त्यामुळे विद्यापीठ एकीकडे शुल्क वाढत असताना दुसरीकडे असे मनोरंजनाचे कार्यक्रम घेणे योग्य आहे का? असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे.

# विजयस्तंभ अभिवादन सोहळा उत्साहात, प्रशासनाचे उत्तम नियोजन आणि अनुयायांकडून शिस्तीचे पालन

● पुणे, अभिजीत येरल्लू :



भरगच्च बसमधून प्रवास, उन्हाचा लागणारा चटका, रस्त्यांच्या कडेला ठिकठिकाणी डीजेच्या तालावर थिरकणारी तरुणाई, पोलिसांच्या सूचनांनुसार पावले चालत असताना विजयस्तंभ परिसराजवळ येताच तरुणांच्या अंगात अचानक संचारणारा उत्साह, हातातील झेंडे आणि मोबाइल उंचावून 'जय भीम'चा जयघोष, अशा उत्साही वातावरणात आणि प्रशासनाच्या उत्तम नियोजनाला अनुयायांकडून शिस्तीचे पालन करत दिलेल्या प्रतिसादामुळे विजयस्तंभ अभिवादन सोहळा बुधवारी उत्साहात पार पडला.

कोरेगाव भीमा येथील २०७ व्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी देश, तसेच राज्यभरातून लाखोंचा जनसमुदाय लोटला होता. मंगळवारी (३१ डिसेंबर) सायंकाळपासूनच विजयस्तंभ परिसरात गर्दी होण्यास सुरुवात झाली होती. बुधवारी (१ जानेवारी) पहाटेच्या सुमारास भंत्यांकडून मंत्रोच्चाराचा जागर करून प्रार्थना करण्यात आली. त्यानंतर मंत्री, नेते, राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती आणि भीम अनुयायांनी दर्शन घेण्यास सुरुवात केली. विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी रात्री सात वाजेपर्यंत रस्त्यांवर गर्दी दिसून आली.

या सोहळ्यासाठी गेल्या वर्षापेक्षा अधिक भीम अनुयायी येणार असल्याची शक्यता गृहीत धरून जिल्हा प्रशासनाकडून गेल्या महिनाभरापासून तयारी करण्यात आली होती. उपाययोजना आणि सुविधांच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाच्या वतीने अनेक बैठका घेण्यात आल्या होत्या. सुविधांच्या अनुषंगाने वेगवेगळ्या समित्या स्थापन करून समन्वय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, वाहतूककोंडी आणि सुरक्षिततेच्या अनुषंगाने पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपी) मोफत बससेवा पुरविण्यात आली होती. भरगच्च बस लोणीकंद येथील वाहनतळापर्यंतच जात असल्याने अनुयायांना विजयस्तंभापर्यंतचे अंतर पायी पार करावे लागले. दोन्ही बाजूंनी रस्ते अनुयायांच्या गर्दीने भरून गेले होते. जिल्हा प्रशासनाकडून रस्त्यांच्या कडेला उभे करण्यात आलेले पाण्याचे टँकर, पोलीस मदत कक्ष, आरोग्य केंद्र, ज्येष्ठांसाठी निवारा कक्ष, वाहनतळ याचा पुरेपूर लाभ घेतानाचे चित्र होते. विशेषत: अनेक सामाजिक संघटनांकडून आणि भीमसैनिकांकडून पाण्याच्या बाटल्या, बिस्कीट, जेवण, ब्लँकेट आणि इतर वस्तूंचे मोठ्या प्रमाणात वाटप करण्यात आले.

### पीएमपी रस्त्यातच अडकल्या

■ या अभिवादन सोहळ्यासाठी मोठ्या प्रमाणात अनुयायी येणार असल्याने प्रशासनाकडून पीएमपीच्या मोफत बसचे नियोजन केले होते. लोणीकंदपासून पेरणे फाट्यापर्यंत बसचे नियोजन केले असताना, दुपारनंतर रस्त्यांवर लोटलेला जनसागर आणि इतर सुविधांसाठी उभारण्यात आलेल्या छोट्या-मोठ्या केंद्रांमुळे लोणीकंदपासून पेरणे फाट्यापर्यंत बसच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे अर्ध्या प्रवासातूनच अनुयायांना बसमधून उतरून पायी प्रवास करावा लागला.

### वाहतूक नियोजन उत्तम

■ पोलीस प्रशासनाकडून वाहतुकीचे उत्तम नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे अतिमहत्त्वाच्या व्यक्तींव्यतिरिक्त कुठल्याच वाहनांना विजयस्तंभापर्यंत प्रवेश दिला गेला नाही. दोन ते तीन टप्प्यांत रस्त्यांवर लोखंडी कठडे उभे करून वाहनांना पुढे जाण्यास मज्जाव करण्यात येत होता. थेट वाहनतळांमध्ये वाहने रवाना करण्यासाठी ठिकठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात होते. त्यामुळे दोन्ही बाजूंच्या चार ते पाच किलोमीटरच्या परिसरातून अनुयायांना सहज चालता येणे शक्य झाले.

### खरेदीसाठी गर्दी

■ विजयस्तंभाच्या मागील मोकळ्या बाजूस मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची दुकाने, पुस्तके, खेळणी, कपडे विक्रीचे छोटे-मोठे व्यावसायिक बसल्याने विजयस्तंभाला अभिवादन करून बाहेर पडताच अनुयायांची पावले आपसूकच वस्तू खरेदी करण्यासाठी पडत होती. या केंद्रांवरदेखील मोठ्या प्रमाणात गर्दी झाल्याने सोहळ्याला जणू जत्रेचे स्वरूप प्राप्त झाल्याचे दिसून आले.



# विदर्भात सर्वाधिक कमी तापमानाची नोंद

● नागपूर, नितीन देवळेकर :

राज्यातील हवामानात मोठ्या प्रमाणात चढउतार होत आहेत. आधी कडाक्याची थंडी, त्यानंतर पाऊस आणि आता पुन्हा एकदा थंडी परतली आहे. विदर्भात सर्वाधिक कमी तापमानाची नोंद नागपूर येथे करण्यात आली. किमान तापमानात तब्बल साडेपाच अंशाची घसरण झाली असून आज ८.८ अंश सेल्सिअस इतके कमी तापमान नोंदवण्यात आले. गेल्या वर्षात राज्यातील वातावरणात सातत्याने बदल घडून आले. आता नवीन वर्षातही वातावरणात बदल दिसून येत आहे. डिसेंबर अखेरीस राज्यात अवकाळी पावसाने हजेरी लावली. मात्र, आता नवीन वर्षाच्या सुरुवातीला पुन्हा एकदा थंडीने जोर पकडला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यात पारा घसरलाय. त्यामुळे त्याठिकाणी गुलाबी जाणवत आहे. तर विदर्भात मात्र अवघ्या २४ तासात वातावरणात बदल झाला आहे. अवघ्या २४ तासात किमान तापमान साडेपाच अंशाने कमी झाले असून ८.८ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. मराठवाडा आणि विदर्भातील किमान तापमानाचा पारा घसरला आहे. मराठवाड्यातील प्रमुख शहर असलेल्या छत्रपती संभाजीनगरमध्ये दोन जानेवारीला निरभ्र आकाश असून तेथील किमान तापमान बारा अंश सेल्सिअस इतके असण्याची शक्यता आहे.